श्रीविद्येचे आचार्यवर्य श्रीअवधूतदत्तात्रेय

—म. स. पारखे

[मिति मार्गशीर्ष शु॥ १४, शके १८८६ शुक्रवार दिनांक १८ डिसेंबर १९६४ रोजीं अक्कलकोट येथील श्रीगुरुमंदिरांत श्री. म. स. पारखे यांनीं केलेलें भाषण. प्रसिद्धिकाल – मिति आश्विन व॥ १२, शके १८८७ गुरुवार दिनांक २१ आक्टोबर, १९६५.]

*

प्रकाशक :
ज. आ. मॉडकर,
भटवाडी, नं. २
गिरगांव, मुंबई नं. ४.

मुद्रक :
गो. दा. बेळगी,
'पेपको,' प्रेस,
३७६ शुक्रवार पेठ, पुणें २.

श्रीविद्येचे आचार्यवर्य श्रीअवधूतदत्तात्रेय

*

— म. स. पारखे

[मिति मार्गशीर्ष शु॥ १४, शके १८८६ शुक्रवार दिनांक १८ डिसेंबर १९६४ रोजीं अक्कलकोट येथील श्रीगुरुमंदिरांत श्री. म. स. पारखे यांनीं केलेलें भाषण. प्रसिद्धिकाल – मिति आश्विन व॥ १२, शके १८८७ गुरुवार दिनांक २१ आक्टोबर, १९६५.]

*


प्रकाशक :

ज. आ. मोंडकर,
भटवाडी, नं. २
गिरगांव, मुंबई नं. ४.

मुद्रक :

गो. दा. बेळगी,
'पेपको,' प्रेस,
३७६ शुक्रवार पेठ, पुणें २.

श्रीअवधूतदत्तात्रेय



अवधूतं परं ब्रह्म संसारार्णवतारकम् ।
दत्तात्रेयमहं वन्दे भक्त्यानन्दविवर्धनम् ॥

श्रीविद्येचे आचार्यवर्य श्रीअवधूतदत्तात्रेय

या स्थानासमोर यापूर्वी तीन चार वेळेला भाषणें करण्याचें भाग्य मला लाभलें आहे. एकच अपवाद सोडल्यास प्रत्येकवेळीं भगवान् परशुरामांच्या अवतार कार्यावर विचार मांडण्याचा मी प्रयत्न केला आणि अक्कलकोटक्षेत्र हें श्रीस्वामी-समर्थांच्यामुळें शक्तिपीठ कसें बनलें यावरहि मी एक दिवस बोललों. श्रीमद्दत्तात्रेयांच्या जयंतिनिमित्त एका अत्यंत महत्त्वपूर्ण व त्या अर्थानें गोपनीय कार्यावर मी चार शब्द बोलावे अशी माझ्या सद्गुरूंची मला अनुज्ञा झाली आहे. त्यांनींच दिलेली दृष्टि व त्यांतून झालेलें ओझरतें दर्शन या आधारें आदि-गुरु अवधूत दत्तात्रेय यांनीं श्रीविद्येचें भूतलावर जें उद्घाटन केलें त्यावर मी आज बोलणार आहे.

दत्तात्रेय हा शब्द उच्चारल्याबरोबर एकदम आपणांसमोर त्रिगुणात्मक त्रैमूर्ति श्रीगुरुदेवदत्त अशी मूर्ति डोळ्यासमोर उभी राहते. श्रीदत्तात्रेय हे प्रत्यक्ष गुरु-अवतार. अखिलजगताचे ते गुरु आहेत, कारण मानवाला आत्मोन्नति करून घ्यावयाची असेल तर त्याला श्रीदत्तात्रेयांना शरण जाण्यशिवाय अन्यमार्ग नाहीं. त्यांच्यावाचून साधक कृतकार्य होऊं शकत नाहीं. गुरूंची स्तुति करावयाचें मनांत आलें कीं, डोळ्यासमोर गुरुंच्या परमानंद स्वरूपाचेंच ध्यान येतें.

ब्रह्मानन्दं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् ।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ॥

एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षीभूतम् ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥
[गुरुगीता–८९

ज्यांचा आनंद ज्ञानांतच आहे, जे संसारापासून उत्पन्न होणाऱ्या भीतीला दूर करणारे आहेत, जे केवळ ज्ञानमूर्ति आहेत, जे सुखदु:खादि द्वंद्वाच्या पलीकडे गेलेले आहेत, आकाशाप्रमाणें निर्लिप्त व सर्वव्यापी आहेत, सर्वसाक्षीरूप भावातीत व त्रिगुणातीत आहेत, अशा एवंगुणविशिष्ट गुरुला मी प्रणाम करतों. असें तें ध्यान आहे.

गुरुशब्दाची केलेली व्युत्पत्ति पाहिल्यास आपणांस हेंच दिसून येईल.

गुकारस्त्वन्धकारश्च रुकारस्तेज उच्यते ।
अज्ञानग्रासकं ब्रह्म गुरुरेव न संशयः ॥
गुकारः प्रथमो वर्णो मायादिगुणभासकः ।
रुकारो द्वितीयो ब्रह्म मायाभ्रान्तिविनाशनम् ॥
[गुरुगीता–२३,२४

अज्ञानाचा नाश करणारे व परमार्थमार्गाचा प्रकाश दाखविणारे असा गुरु या शब्दाचा अर्थ होतो. मायेच्या योगानें उत्पन्न झालेली भ्रांति नाहींशी करून जे एकमेवाद्वितीय परमात्म्याशीं एकरूप करवून देतात तेच गुरु.

गुरुगीतेमध्यें सद्गुरुची महती वर्णन करण्याच्या प्रसंगानें श्रीदत्तात्रेयांचें मोठे बहारीचें वर्णन केलें आहे.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुरेव परब्रह्म तस्मै श्रीगुरुवे नमः ॥
हेतवे जगतामेव संसारार्णवसेतवे ।
प्रभवे सर्वविद्यानां शंभवे गुरवे नमः ॥
त्वं पिता त्वं च मे माता त्वं बंधुस्त्वं च देवता ।
संसारप्रतिबोधार्थं तस्मै श्रीगुरवे नमः ॥
शिवे क्रुद्धे गुरुस्त्राता, गुरौ क्रुद्धे शिवो न हि ।
तस्मात्सर्वप्रयत्नेन श्रीगुरुं शरणं व्रजेत् ॥

ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदम् ।
मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोः कृपा ॥

[गुरुगीता – ३२,३५,४४ व ७६

यावरून गुरुच पिता, गुरुच माता, गुरुच देव व गुरुच परमा गति होय. गुरु हेच ब्रह्माविष्णुमहेशरूप आहेत. गुरु आणि ब्रह्म यांच्यांत भेद नाहीं. गुरूंची मूर्ति हेंच ध्यानाचें मूळ, गुरुचरण हेंच पूजेचें स्थळ, गुरुवाक्य हाच मंत्र, व गुरुकृपा हीच सिद्धि होय. श्रीहरि प्रसन्न असतांहि वैष्णवजन गुरुभक्तिमार्ग आचरतात; कारण श्रीसद्गुरु प्रसन्न असतील तर श्रीहरि संतुष्ट होऊन सर्वसिद्धि प्रदान करतात. थोडक्यांत सांगावयाचे झाल्यास 'सद्गुरु वांचोनी सांपडेना सोय' हाच सिद्धांत त्रिकालाबाधित आहे याची खात्री पटते. गुरुची महती काय आहे हें दर्शविण्यासाठींच कीं काय श्रीदत्तात्रेयांनीं स्वतः चोवीस गुरु केले असावेत. भगवान् परशुरामांनींहि दत्तात्रेयांना महेश्वरस्वरूप म्हणूनच गौरविलें आहे. परमात्माच सृष्टीचा त्रिकालाबाधित गुरु आहे.

' स पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात् '

असें पातंजलयोगसूत्राचें वचनच आहे. सृष्टिकालीं लोकपित्या ऋषींना वेदादि पवित्रशास्त्रांच्या द्वारा पृथ्वीपासून परमेश्वरापर्यंतचें ज्ञानभांडार प्रत्यक्ष परमेश्वरानेंच दिलें आहे. अवधूतांची शिष्यपरंपरा सर्वसाधारण मानवापासून थेट परमोच्चकोटीला पोहोंचलेल्या साधकापर्यंत दिसून येते.

दत्तात्रेयांच्या जन्माची जी लोकप्रिय कथा आहे ती आपण सर्वजण जाणतांच. दत्तात्रेयांचें जें जन्मरहस्य आहे, तें त्या कथेंत गोविलेलें आहे. याबद्दल मी नंतर थोडा वेळ बोलणार आहे. निरनिराळ्या पुराणांतून दत्तात्रेयांच्या जन्मकथांचे जे संदर्भ उपलब्ध आहेत तेहि मी सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. परंतु एक गोष्ट आपणां सर्वांना माहीत आहे कीं, ब्रह्मा विष्णु महेश या त्रिमूर्तींनीं अनसूयेच्या उदरीं जन्म घेतला आणि हें जें त्रिमूर्तींचें एकीकरण आपणांला दत्तात्रेयांच्या ठायीं पहावयास मिळतें तेंच तत्त्व मी या आजच्या भाषणांत उकलण्याचा प्रयत्न करणार आहे.

भगवान् परशुरामांच्या चरित्राचा अभ्यास करीत असतांना, त्रिपुरारहस्य या ग्रंथांत एक महत्त्वपूर्ण घटना माझ्या लक्षांत आली. आदिगुरु श्रीमद्दत्तात्रेय हे परशुरामांचे गुरु असून त्यांनीं विशिष्ट दीक्षा परशुरामांना दिली. हा विधि विस्तारपूर्वक महानिर्वाणतंत्रांतहि पहावयास मिळतो. दत्तात्रेयांचा व भार्गवांचा एक संवाद त्यांत दिला असून त्यावरून या घटनेचा सर्वांगीण परिचय होऊं शकतो. भगवंताच्या अनेक अवतारांपैकीं दत्तात्रेय व परशुराम हे दोन्हीहि अवतार आहेत. मग भगवान् विष्णूंच्या एका अवतारानें दुसऱ्या अवतारास उपदेश केला हें कसें ? आणि कां ? हा माझ्यापुढें प्रश्न होता. आणि या प्रश्नाची उकल होत असतांना साहजिकच अत्रि महामुनि आणि सती अनसूया यांच्या जीवनकार्यांचें परिशीलन करावें लागलें. एक गोष्ट लक्षांत आली कीं, सृष्टीच्या अखंड व्यवहारासाठीं विधात्यानें योजलेली एक महत्त्वपूर्ण परंपरा या घटनेमागे आहे.

प्रतिवर्षीं दत्तात्रेयांच्या जन्मोत्सवाचा सोहळा या स्थानीं होतोच. कीर्तनकारांचीं प्रासादिक व रसाळ वर्णनेंहि आपण ऐकलेलीं आहेत. सर्वसाधारणपणें लोकप्रिय असलेली जन्मकथा आपण जाणतांच. अत्रि महामुनींची भार्या अनसूया आपल्या सतीत्वामुळें त्रिखंडांत पूजिली जात होती. ब्रह्मा विष्णु महेश यांच्या पत्न्यांना त्यामुळें अनसूयेविषयीं असूया निर्माण झाली; आणि तिचें सत्त्व हरण करण्यासाठीं आपल्या पतींना अतिथिवेष घेऊन त्यांनीं तिच्याकडे जावयास लाविले. त्यावेळीं अत्रि महामुनि आश्रमांत नव्हते. आलेल्या अतिथींचें स्वागत करून अनसूयेनें त्यांना भिक्षा वाढण्याचें ठरविलें. पण विवस्त्र होऊन भोजन वाढलें तरच आम्ही अन्नग्रहण करूं अशी अट सत्त्वहरणाच्या निमित्तानें त्यांनीं घातली. आलेल्या अडचणींतून मार्ग काढण्यासाठीं आपल्या पतीचें स्मरण करून अतिथिरूप घेऊन आलेल्या देवांच्यावर अनसूयेनें तीर्थ शिंपडलें आणि त्यामुळें ते तिघेहि ब्रह्मा, विष्णु, महेश, लहान बाळें झालीं.

क्षण एक ध्यानस्थ । राहोनि केला बेत निश्चित ।
उदक घेऊनी हस्तांत । सिंचन करी तयांवरी ॥
जरि मी पतिव्रता खरी । दृढ निष्ठा पतीवरी ।
पतीवीण जगदांतरीं । प्रिय आन नसेल ॥

तरी हे द्विज या काळीं । बाळें होवोनी सोज्वळी ।
भोजन करोत मुखकमळीं । ग्रास घालीन वात्सल्यें ॥
[श्रीगुरुलीलामृत २. ९४–९६

असा हा दत्तात्रेयांचा जन्मसोहळा आहे. आपले पति परत कां आले नाहींत यामुळें घाबरलेल्या लक्ष्मी, सरस्वती व पार्वती यांना जेव्हां झालेला प्रकार कळला तेव्हां त्यांची मोठी दयनीय परिस्थिति झाली. अनसूया व अत्रिमुनींनीं त्यांना पूर्वस्वरूपवत् केले आणि त्यामुळें संतुष्ट होऊन "तुझ्या उदरीं आम्ही येऊं" असा त्यांनीं आशीर्वाद दिला.

दत्तशब्दें वरलाभ । दत्तचि नाम ठेविलें सुलभ ॥
विधि शंकर पद्मनाभ । जन्मा आले ऐक्यत्वें ॥
त्रिगुणात्मक अवतार । वैराग्यशील दिगंबर ।
परमहंस दीक्षा थोर । जगदोद्धारा अवतरले ॥
दत्तात्रेय सर्वव्यापक । विष्णुअंश मुख्य देख ।
अविद्याकानन दाहक । भक्ततारणा विचरती ॥
कलीमाजी दत्तोपासना । सद्यःफलदायक जाणा ।
आधिव्याधिपीडितजनां । सुखदायक तात्काळ ॥
[श्रीगुरुलीलामृत २. ११३–११६

निरनिराळ्या पुराणांतून दत्तात्रेयांच्या जन्माच्या कथा प्रचलित आहेत पण कथांची मांडणी जरा निरनिराळी आहे. असें जरी असले तरी दत्तात्रेयांचा अनसूयेच्या उदरीं जन्म झाला ही गोष्ट मुख्यत्वें करून सर्वत्र आढळते.

श्रीमद्भागवतांत दत्तजन्माची एक कथा आहे. पुत्रप्राप्तीसाठीं अत्रिमहामुनींनीं ऋक्षकुल पर्वतावर महान् तपश्चर्या केली. आणि त्या तपानें प्रसन्न होऊन खुद्द ब्रह्मा, विष्णु, महेश, हे तिघेहि मुनींच्या समोर प्रगट झाले. 'मी तर एकाचीच तपस्या करून त्याला आवाहन केले होते, मग आपण तिघे कसे आलात ?' असा प्रश्न अत्रिमुनींनी केला. तेव्हां 'तूं ज्या एका तत्त्वाचें ध्यान करीत आहेस त्याचेच आम्ही तिघेजण अंशमय आहोंत' असें म्हणून अत्रींची विनंती त्यांनीं मान्य केली

व या देवत्रयींच्या आशीर्वादानें ब्रह्मापासून सोम, शिवापासून दुर्वास व विष्णू-पासून दत्त हे तीन पुत्र अनसूयेच्या उदरीं जन्मले.

ब्रह्मांडपुराणांत जवळजवळ अशीच कथा आहे. पण आपणां तिघाबरोबरच मला एक रूपवती कन्याहि प्राप्त व्हावी असा आशीर्वाद अत्रिमुनींनी मागितलेला दिसतो आणि त्यांना शुभात्रेयी नांवाची कन्या झाली असें त्या पुराणांत म्हटलें आहे. कन्येचें नांवहि असेंच अन्वर्थक आहे.

वायुपुराणांत किंवा कूर्मपुराणांत सतीत्वाची महती वर्णन करीत असतांना आणखी एक उल्लेख आढळतो. प्रतिष्ठान नगरांत कौशिक नांवाच्या एका ब्राह्मणाला नित्य वेश्यागमनामुळें आपल्या अत्यंत साध्वी अशा स्त्रीची चाड राहिली नव्हती. कालांतरानें रोगराईनें त्याचीं गात्रें गळूं लागतांच वेश्येनें त्याचा त्याग केला. पत्नीची आठवण होऊन तिजकडे तो आला असतां त्या सेवापरायण साध्वीनें पतीची शुश्रुषा केली तरी वेश्येवरचें त्याचें ध्यान जाईना. तिजकडे घेऊन जाण्याचा आग्रह एक दिवस त्यानें पत्नीजवळ धरला. रात्रीच्या अंधारांत कौशिकाला नेत असतांना चोर समजून सुळावर चढविलेल्या मांडवीऋषींना कौशिकाचा धक्का लागला. "सूर्योदय झाल्यावर तूं मरशील" असा ऋषीचा शाप ऐकतांच आपल्या पतीस वांचविण्यासाठीं सतीत्वाच्या प्रभावानें तिनें सूर्योदयच थांबविला. विश्वचक्रांतील या बिघाडामुळें देवदेवता घाबरून गेल्या व ब्रह्मदेवाच्या सांगण्या-वरून सती अनसूयेनें मध्यस्थी करण्याचें ठरविलें आणि कौशिकपत्नीला अभय देऊन सूर्योदय घडवून आणला. मांडव्यांचा शाप जरी खरा ठरला तरी अनसूयेनें त्यांना पुन्हां जिवंत केलें आणि देवांनीं अनसूयेला प्रसन्न होऊन आशीर्वाद दिला कीं, त्रिमूर्ति तुझ्या उदरीं जन्म घेतील.

महाभारतांतील अनुशासनपर्वांत थोडीशी निराळी कथा आहे. राहूनें सूर्यास ग्रस्त केलें असतां अत्रींनीं त्याला सोडविले व पृथ्वी पुन्हां प्रकाशमय केली. या महान् कार्यामुळें दुर्वासरूपानें आणि दत्तरूपानें शिवविष्णूंनीं अत्रींच्या घरीं जन्म घेतला.

ऋग्वेदांत याबद्दलचा उल्लेख ५ व्या मंडलांत ४० साव्या सूक्तांत आढळतो. राहूनें अंधःकारानें सूर्यास ग्रासले असतां जें इतरांना जमलें नाहीं तें अत्रींनीं केलें असा तो उल्लेख आहे.

सुरवातीस म्हटल्याप्रमाणें निरनिराळ्या कथांत फरक असला तरी अत्रिअनसूयेच्या घरीं त्रिमूर्तींनीं जन्म घेतला ही गोष्ट त्यांत दिसून येते. माझ्या दृष्टीनें यांत एक महत्त्वाचा संकेत आपणांस पहावयास मिळेल. अगदीं सुरवातीलाच मी जी कथा सांगितली, तिच्यावर जर आपण विचार केला तर असें दिसून येईल कीं, एका मूळ शक्तीची उपासना अत्रिमहामुनींनीं चालविली असावी आणि म्हणूनच 'मी एकाची उपासना करीत असतांना आपण तिघे कां?' असा प्रश्न त्यांनीं विचारलेला दिसतो. पण त्याच मूळ शक्तीचें आम्हीं तिघे अंश आहोंत हें ब्रह्मा-विष्णु-महेशांनीं सांगण्यांत किंवा त्रिमूर्तिरूपानें त्या शक्तींनीं अनसूयेच्या उदरीं जन्म घेण्यांत जी मूळ शक्ति त्रिविधा झाली होती तिचें त्यानंतर दत्तात्रेयांच्या रूपानें ऐक्यच व्हावयाचें होतें, असाच अर्थ आपणाला या घटनेबद्दल लावावा लागेल. अत्रिमहामुनींच्या नांवांतहि तोच संकेत आढळतो. शक्तीचें त्रिवृत्करण नव्हे तर त्यांचें ऐक्य, असाच त्यांच्या नांवाचा अर्थ काढावा लागेल.

एकादे वेळीं असा एक प्रश्न उपस्थित करण्यांत येईल कीं, ब्रह्माच्या अंशानें सोम, शिवाच्या अंशानें दुर्वास व विष्णूच्या अंशानें व आशीर्वादानें दत्तात्रेय असे तीन पुत्र अत्रींना झाले याचा अर्थ कसा लावावयाचा? तिन्ही देवतांचें दत्तात्रेयांच्या रूपानें एकीकरण झालें, पण तीनहि अंशांचें तीन पुत्र झाले असें मानलें तर त्यांत एकीकरण कसें दाखवितां येईल? विष्णुस्वरूप दत्तांचे ठायीं ब्रह्मा व महेशरुपी सोम-दुर्वासांनीं आपल्या अंशाची स्थापना केली आणि दत्तात्रेयांचा अवतार आकाराला आला असेंच म्हणावें लागेल. श्रीविद्येचे जे द्वादश उपासक प्रसिद्ध आहेत, त्यांत सोम व दुर्वास यांचा महत्त्वाचा उल्लेख आढळतो. दत्तात्रेय किंवा अन्य उपासकांचा, आचार्यांचा त्यांत उल्लेख नाहीं. याचा अर्थ ती यादी संपूर्ण मानण्याचे कारण नाहीं. त्या तंत्रानें तसा दावाहि मांडलेला नाहीं. श्रीविद्यार्णवतंत्रांत खालील-प्रमाणें द्वादश उपासकांचीं नांवें दिलीं आहेत.

मनुश्चन्द्रः कुबेरश्च लोपामुद्रा च कामराट् ।
अगस्त्यनन्दिसूर्याश्च विष्णुस्कन्दशिवास्तथा ॥
दुर्वासाश्च महादेव्या द्वादशोपासकाः स्मृताः ॥

[श्रीविद्यार्णवतंत्र पृ. १४०.१-२

दत्तात्रेय आणि श्रीविद्या यांचा संबंध आपण नंतर पाहाणार आहोंत. सोम व दुर्वास हें ज्या श्रीविद्येचे उपासक आहेत, तिचेच उद्गाता दत्तात्रेय आहेत हें लक्षांत आल्यावर त्यांचे अन्योन्य संबंध लक्षांत येऊं शकतात.

तीनहि मूर्ति एकत्र येऊन दत्तात्रेयांचें स्वरूप झालें असें मानले काय किंवा आदिशक्तीची उपासना वाढविण्यासाठीं तीन रूपांनीं अनसूयेच्या उदरीं जन्म घेतला असें म्हटलें काय? तात्त्विक दृष्ट्या यांमध्यें एकच बैठक आहे हें आपल्या लक्षांत येईल. ज्या मातापित्यांच्या उदरीं दत्तात्रेयांचा जन्म झाला, त्यांच्या नांवाचा अभ्यास करतानांहि हीच गोष्ट लक्षांत येते. दत्तात्रेयांचे जनक हे अत्रि म्हणजे 'त्रि नाहींत ते', ज्यांच्या मधलें त्रित्व जाऊन ऐक्य झालें आहे ते, हें आपण आतांच पाहिलें. भगवद्गीतेमध्यें ' तूं त्रिगुणातीत हो ' हाच उपदेश भगवंतांनीं अर्जुनाला केला आहे. माहेश्वरी चिच्छक्ति, साकाररूप धारण करून पुत्ररूपानें आपणांस प्राप्त व्हावी हा संकल्प चित्तीं धरून महर्षींचें तपाचरण चालूं होतें. अनसूया माता याहि कशा? त्या तर असूयाविरहित. असूया हा स्त्रियांचा स्वाभाविक दोष. दत्तात्रेयांचा जन्महि ब्रह्माविष्णूमहेश यांच्या पत्न्यांच्या असूयेतूनच झाला आहे, हें आपण जाणतोच. आणि हा स्वाभाविक दोष नसलेली साध्वी अनसूया. घरीं आलेल्या अतिथीस साक्षात् सदाशिव मानून, त्यांना इच्छाभोजन देण्याची तिची उपासना चालूंच होती. ऐक्य निर्माण व्हावयास आवश्यक असलेली नैतिक बैठक अशा रीतीनें प्रथमपासूनच तयार होती असें म्हणतां येईल.

साहजिकच ओघाओघानें हें त्रिवृत्करण काय आहे, असा मनासमोर प्रश्न येतो. दत्तात्रेयांच्या मूर्तिबद्दल दोन प्रकारचे विचार पाहावयास मिळतात. एकमुखी, त्रिमुखी आणि चतुर्भुज किंवा षड्भुज मूर्ति कांहीं कांहीं ठिकाणीं असल्या तरी तुकोबारायांनीं आपल्या अभंगांत वर्णन केल्याप्रमाणेंच आज बहुतेक ठिकाणीं दत्तमूर्ति आढळतात. त्या अशाच आहेत:

तीन शिरें सहा हात । तया माझा दंडवत ॥
काखे झोळी पुढें श्वान । नित्य जान्हवीचें स्नान ॥
माथां शोभे जटाभार । अंगीं विभूति सुंदर ॥
शंख चक्र गदा हातीं । पायीं खडावा गर्जती ॥
तुका म्हणे दिगंबर । तया माझा नमस्कार ॥ [आजगांवकर २३७

हीं तीनहि शिरें, ब्रह्मा, विष्णु, महेश यांच्या ऐक्याचीं प्रतीकेंच म्हणावीं लागतील. माथ्यावर शोभणारा जटाभार किंवा अंगाला लावलेली विभूति ही शिवाचे द्योतक आहेत. शंख व चक्र हीं तर विष्णूचीं प्रिय आयुधें आहेत. कांहीं कांहीं मूर्तिमध्यें दिसणारा त्रिशूळ व डमरु ही मूर्तींतील शिव प्राधान्य दर्शवितात, तर अक्षमाला व कमण्डलु हीं आपणांला ब्रह्माचीं प्रतीकें मानावीं लागतील. दत्तात्रेयांच्या अवतिभवति जे चार श्वान आहेत ती स्वर्गाकडे धांव घेणारीं व सत्याचें प्रतिपादन करणारीं चतुर्वेदांचीं स्वरूपें मानलीं जातात. धेनु ही पृथ्वीस्वरूप आहे. या वर्णनावरून आपल्या सहज लक्षांत येईल कीं, दत्तात्रेयांच्या या मूर्तिमध्यें कोणतें तत्त्व गोवलें आहे.

हें जें "त्रिक" आहे तेंहि आपणां सर्वांचें मनोरंजन करणारें आहे. ब्रह्मा, विष्णु, महेश या त्रिमूर्तिप्रमाणें जीव, जगत् व जगदीश्वर हीं त्रितत्त्वें आहेत. सत्त्व, रज, तम त्रिगुण आहेत. स्वर्ग, मृत्यु, पाताळ त्रिलोक; आदिभौतिक, आदिदैविक, आध्यात्मिक हे त्रिताप; कायिक, वाचिक, मानसिक हे त्रितप; भूत, भविष्य, वर्तमान हे त्रिकाळ; कर्म, ज्ञान, भक्ति हे त्रियोग; उत्पत्ति, स्थिति, लय या तीन अवस्था; मानवानें जगतावर येतांना ऋण आणलें तेंहि तिघांचेंच-- देवांचें, पितरांचें आणि ऋषींचें; वात, पित्त, कफ हे शरिरांत असलेले दोष; ध्याता ध्येय, ध्यान हें साधकासाठीं आवश्यक असलेलें स्वरूप; शास्त्र, गुरु, आत्मा ह्या प्रचीति; उत्तम, मध्यम, हीन या अवस्था; हें किंवा या सारखेच अनेक त्रिवृत्तांचें वर्णन करतां येईल. ज्या मूळ शक्तीची त्रिमूर्ति हीं तीन स्वरूपें झालीं तिचें नांवहि त्रिपुरा. तिघांच्या अगोदरची म्हणून त्रि-पुरा. या त्रिपुरेचें चित्रित स्वरूप बिंदु व त्रिकोणांनीं दाखविलें आहे. ज्या घनीभूत शक्तीपासून आपण निघालों आहोत व जेथें आपणांस विलीन व्हावयाचें आहे, त्याचें प्रतीक बिंदूंत मानलें तर त्रिकोण हा त्याचा मार्ग आहे. भूमितीचा अभ्यास करणाऱ्याला एक गोष्ट सहज पटेल कीं, निघालेल्या स्थळापासून पुढें जात जात उलट परत न फिरतां जर मूळ स्थानाला परत यावयाचे असेल तर त्रिकोण हा त्यांतील सर्वांत जवळचा आणि सरळ मार्ग आहे. ध्येय गांठण्याच्या वाटचालींत सरळ आणि जवळचा मार्ग मिळणार असेल तर तोच आपण अवलंबावयाला हवा. तोच श्रीविद्येच्या रूपानें जगतावर प्रकट झाला आहे. आजचा विषयहि त्रिपुरमहासुंदरीचा किंवा पर्यायानें श्रीविद्येचा श्रीमद्दत्तात्रेयांशीं जो संबंध आहे तो दाखविण्याचाच आहे.

बिल्वदल म्हटलें कीं आपणाला शिवाचें स्मरण होतें. शिवाला प्रिय असणारें पत्र त्रिदळात्मक आहे ही लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे. बिल्व वृक्षाचा इतिहास पाहिला तर त्याला श्रीवृक्ष म्हणतात. त्याची निर्मिति ही श्रीदेवीच्या हस्तांतून झालेली आणि जणूं कांहीं त्रिपुरसुंदरीशीं असणारा घनिष्ठ संबंध दाखविण्यासाठीं बिल्वपत्राला पानें किती तर तीनच. बिल्वफलाला श्रीफल म्हणतात. शिवशक्ति यांचें ऐक्यच झाल्यानें त्रिशूळ व त्रिपुण्ड्र धारण करणारे शिव हेहि त्रिनेत्र आहेत. त्यांनाच श्रीविद्येचे आदिनाथ म्हटलें जाते.

बडोद्याजवळ एक सिद्धभूमि आहे. अन्यत्र कोठेंहि आपण पाहिलें तरी पळसाला तीन पानें असतात. पण या भूमींतील एका पळसाला एकच पान येतें म्हणजेच त्रिकाचें ऐक्यत्व येथें झालेलें आहे. या झाडाच्या भोंवतीं अनेक भाविक लोक आपलीं संकटें व अडचणी यांतून मुक्तता व्हावी म्हणून येतात. त्यांच्या अपेक्षा पूर्ण झाल्या तरी त्या कशामुळें हें त्या बिचाऱ्यांना माहीत नसतें. परशुरामांचें वास्तव्य या झाडाखालीं आहे असें एका सत्पुरुषानें एका भाग्यवानास सांगितले. त्रिवृत्करणांतून आपली माया जगताला दाखविणाऱ्या आदिशक्तीचें मूळ स्वरूप काय आहे हेंच पटवून देण्याचा हेतु या स्थानावर असावा. नाहीं तर निसर्गविपरीत घटनेचा अन्य कोणता अर्थ आपण लावूं शकतों !

मूळ ऐक्याचें जे त्रिवृत्करण झालें त्याचे संदर्भ आपणांस उपनिषदांतूनहि मिळतात. अर्थात् पंचीकरणाचेहि उल्लेख त्यांत आहेत हेंहि खरें. भगवंताचीं अनेक लक्षणें त्रिविध स्वरूपाचीं आहेत. तो जसा सत्, चित्, आनंद आहे तसाच तो शिव, शांत, सुंदरहि आहे. वेदांतून इंद्र, अग्नि, वरूण किंवा आदित्य, विद्युत् व अग्नि असेंच उल्लेख आढळतात. अग्नि घेतला तरी त्याचें स्वरूपहि त्रिविधच आहे. त्याला त्रिपाद् किंवा त्रिचरण म्हणतात. आहवनीय, दक्षिण, गार्हपत्य, हे ते त्रिपाद् होत. आदिमाया हें शक्तिसर्वस्वाचें द्योतक तर अग्नि हें तेजाचें, प्रखर शक्तीचें स्वरूप; त्या अग्नीला त्रिचरण दाखविले जावेत हें आपण लक्षांत घ्यावें. श्रीविद्येचें स्थूल स्वरूप म्हणून गायत्रीचा उल्लेख करतात तीहि त्रिपदाच आहे. संस्कारानें द्विज झालेला बटु जें यज्ञोपवीत धारण करतो तेंहि तीन सूत्रांचें आणि त्यांचें एकीकरण केल्यावर जी गांठ पडते तिला ब्रह्मगांठ म्हणतात. नाहीं तरी

त्या परब्रह्माची प्राप्ति हाच ध्येयबिंदु असावयास हवा याची सदैव आठवण राहण्यासाठीं तर नाहींना ही ब्रह्मगांठ ! मानव बरोबर घेऊन येतो तें कर्महि तीन प्रकारचें–प्रारब्ध, क्रियमाण, संचित. यांतून बाहेर पडण्याचें मार्गहि तीनच–ज्ञान, उपासना, कर्म. योगमार्गांतल्या नाड्याहि तीनच–इडा, पिंगला, सुषुम्ना. दोन जीवांचें ऐक्य ज्या विवाहसंस्कारानें होतें त्याचे प्रकारहि तीनच–ब्राह्म, अर्क, कुंभ. कुंभविवाह हा व्यावहारिक दृष्टीनें एका विशिष्ट परिस्थितींत लावण्याची रूढी असली तरी गुरुपरंपरेंत या कुंभविवाहाला फार मोठें स्थान आहे. हा गूढ विषय आहे. अध्यात्ममार्गांतल्या जिज्ञासूनें तो जाणण्याजोगा आहे. ध्याता, ध्यान, ध्येय यांचें ऐक्य साधणारें एक महत्त्वाचें गुरुकृपेचें प्रतीक कुंभविवाहांत आहे. उपासनेमधील जिला एक अत्यंत महत्त्वाची उपासना म्हणून म्हणतां येईल ती प्रणवोपासना अ + उ + म् = ॐ या तीन अक्षरांनींच बनलेली आहे. दशावतारांतहि राम तीन आहेत–परशुराम, दाशरथिराम आणि बलराम.

एकादें तत्त्व ज्यावेळीं विशिष्ट हेतूनें मानवजातीकरितां पृथ्वीतलावर प्रसृत केलें जातें त्यावेळीं त्याची मांडणी निरनिराळ्या व्यक्ताव्यक्त स्वरूपांत केलेली असते. त्या तत्त्वाची विश्वमयता विचारवंताला स्वाध्यायानंतर व भाग्यवंताला अनुभूतीनंतर प्रत्ययाला येत असते. जीवनांतल्या त्रिविध प्रकारांचा किंवा त्रिकूटांचा शोध करावयाचा झाला तर आणखी केवढी तरी मोठी यादी आपणांला मिळवितां येईल. त्या प्रत्येक ठिकाणीं कांहीं ना कांहीं तरी तत्त्व पेरून ठेवलेलें आहे असें अभ्यासाअंतीं लक्षांत येईल.

योगमार्गांत "मृगीमुद्रे"ला एक विशिष्ट स्थान आहे. ध्यात्याला जें ध्येय गाठावयाचें आहे, त्यासाठीं आवश्यक असलेलें ध्यान हें व्याधाप्रमाणें एकाग्र असावयास हवें याची जणूं जाणीव करून देण्यासाठींच 'मृगीमुद्रा' असावी. आदिमाया महात्रिपुरसुंदरीच्या एका हातांत मृगाचा मागील पाय धरलेला असून वेगानें झेंप घेण्याची त्या मृगाची धडपड चाललेली आहे. अशी मूर्ति दक्षिणेंत पहावयास मिळते. श्रीमद्दत्तात्रेयांचा जन्म हा मार्गशीर्ष शु।। १५ ला झाला. त्यावेळीं पूर्वेस क्षितिजाकडे पाहिलें तर ब्रह्मा, विष्णू, महेश अशा नामधारक तार्‍यांचें गुच्छ दिसतात. मृगाचें शरीरहि तीन तारकांचे आहे. ब्रह्महृदय, अग्नि व

प्रजापति हेहि तीन तारे मृगाजवळ आहेत. महादेवशास्त्री जोश्यांना चार पायांचें लांब चौकोनी मृगनक्षत्र पाळण्याच्या जागीं वाटते, तर मधला इक्षुत्रिकांड हीं आंत पहूडलेलीं तीन गोजिरीं बालकें आहेत असें त्यांच्या काव्यमय कल्पनेला दिसते. दत्तजन्माचा गुलाल उधळीत असतांना मृगाचा पाळणा आंतील तीन बालकांसह झुलूं लागला हेंच एक विखरून ठेवलेलें परमेश्वराचें मायास्वरूप आहे असें म्हणावें लागेल.

दत्तात्रेयांचें त्रिमूर्तिस्वरूप हें असें आहे. त्रिमूर्ति दत्तात्रेय हा 'ब्रह्माविष्णुमयो रुद्रः' या कल्पनेचा त्रिकांची आवड असणाऱ्या भारतीय परंपरेनें केलेला कलात्मक अविष्कार असावा असें जरी कांहीं विद्वानांना वाटत असलें तरी उपासकानें आपल्या भक्तिप्रणवप्रज्ञेनें उपास्याचें तात्त्विक स्वरूप घडविलेलें नाहीं तर अनुभूतीनें तिचें आकलन केलें आहे असेंच म्हणावें लागेल. या मूर्तीच्या चरित्राचा अभ्यास करावयाचा म्हटलें तर त्रिविध प्रकारचे साहित्य आपणांला धुंडाळावें लागेल– उपनिषद्साहित्य, पौराणिकसाहित्य आणि तंत्रसाहित्य. उपनिषदांत त्रिमूर्तींची कल्पना पहावयाला मिळते. त्रिमूर्तिरेका त्रिधा कृता । हा रुद्रहृदयोपनिषदांतील उल्लेख चिंतनीय आहे. किंवा 'त्वं ब्रह्मा त्वं च वै विष्णुस्त्वं रुद्रः । हा मैत्रायणीयोपनिषदांतील उल्लेख ब्रह्माविष्णुमहेशात्मक त्रिमूर्तिकल्पनेचें दृढीकरण करणारा आहे. पुराणग्रंथांतून याच त्रिमूर्तींचा अनसूयेच्या उदरीं दत्तात्रेयाच्या रूपानें जन्म झाला हें आपण पाहिलें.

अवधूत दत्तात्रेयांचें अवतारकार्यहि अविरत चालूं आहे. स्वयंभूमन्वन्तराचे पूर्वी सत्ययुगांत दत्तात्रेयांचा अवतार झाला. संसारी माणसाच्या मागें लागलेलें दुःख व ताप नष्ट करण्यासाठीं स्वेच्छेनेंच ते जगतांत अवतीर्ण झाले आणि म्हणूनच जोपर्यंत दुःख व ताप शिल्लक आहेत तोंपर्यंत ते स्वतः देखील पार्थिव देहाचें विसर्जन न करतां एकच भावानें व एकच देहानें ते संचार करीत राहतील. महाप्रलय होईपर्यंत त्यांचें अस्तित्व अवश्य आहे. स्मरण करतांच भक्तांना दर्शन देऊन यथासंभव ते त्यांचें दुःख दूर करतात.

दत्तजन्माचें हें रहस्य व त्यामागील विशाल तत्त्व लक्षांत घेऊन आपण तंत्रसाहित्याकडे वळलों तर त्या साहित्याच्या परिशीलनानें श्रीमद्दत्तात्रेयांच्या प्रधानकार्याची

आपणांला कल्पना करतां येते. महात्रिपुरसुंदरीच्या उपासनेचें उद्घाटन हा त्यांतील प्रधान हेतु दिसतो.

' अनादिशक्तीचें रहस्य जाणणारे, ' असा दत्तात्रेयांचा उल्लेख करतां येईल. कारण त्रिपुरारहस्याचे ते उद्गाता आहेत. त्रिपुरारहस्यांतील दत्तात्रयांचें वर्णन मोठे मार्मिक आणि वरवर विचार करणारांची गफलत करणारें असें आहे. वस्तुतः दत्तात्रेय हे विष्णूंचे अवतार, पण विष्णुप्रमाणें षड्गुणैश्वर्यसंपन्नता किंवा राजैश्वर्य अशा वर्णनाऐवजीं जटाजूटधर दिगंबर स्वेच्छाचारी अवधूत असें दत्तात्रेयांचें वर्णन आढळतें. आसनस्थ अशी दिगंबर मूर्ति, मांडीवर विवस्त्र स्त्री व हातांत मद्यघट, असें दत्तात्रेयांचें दर्शन अनेक भक्तांना झालेलें आहे. श्रीवासुदेवानंदसरस्वती या प्रसंगाचें मोठें मार्मिक वर्णन करतात.

श्रीदत्त बोले हांसोन । स्त्रीचें उच्छिष्ट खाऊन ।
भ्रष्ट झालों मी पीवून । पानशेष दूषित मी ।।
मद्यासक्त मी न वशी । माझी स्थिति झाली अशी ।
व्यर्थ तुम्ही मजपाशीं । आलेत शीघ्र चला परत ।।
[दत्तमाहात्म्य ५.४३–४४

आपली महत्तता लपविण्यासाठीं हेतुतः त्यांनीं असें आचरण स्वीकारलें आहे, असें कांहींना वाटतें. अनधिकारी लोकांनीं आपल्या भोंवतीं ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीसाठीं गर्दी करूं नये, उलट विकृत बाह्याचरणाकडे पाहून दुरूनच त्यांनीं निवृत्त व्हावे यासाठीं मदिरा व मदिराक्षींत ते रंगलेले आहेत असें कांहींना म्हणावयाचें आहे. शाक्तांच्या प्रसिद्ध पांच मकारांपैकीं मद्य आणि मैथुन दत्तात्रेयांनीं अवलंबिलें तें केवळ याच उद्देशानें असें त्यांना म्हणावयाचें आहे. परंतु मकारांचे वाच्यार्थ घ्यावयाचे नसून आपणांला लक्ष्यार्थाकडे जावयाला हवे. वाच्यार्थानें अधोगति व नाश ठरलेला आहे, उलट लक्ष्यार्थ तुम्हांस योग्य मार्ग दाखविणारा आहे. विवस्त्र स्त्री हे आदिशक्तीनें कृत्रिम बाह्य आवरण काढून टाकले असतां व्यतीत होणाऱ्या मूळस्वरूपाचें प्रतीक आहे. बाह्य उपाधीपासून वांचविणारें व आपल्याच आनंदांत गुंगून टाकणारें परब्रह्माचें ज्ञान ज्या योगमार्गानें मिळतें त्याचे प्रतीक मद्यघट आहे. याउलट दत्तात्रेयांनीं ज्या दोन मकारांचा अवलंब केला त्यांचा शाब्दिक अर्थ घेऊन

जर साधक अनुकरण करील तर त्याला कोणती गति प्राप्त होईल . हें सांगण्याचें कारण नाहीं. वाच्यार्थ खरा कसा नाहीं यासाठीं खुद्द दत्तात्रेयांनींच अवधूतगीतेंत तत्त्वनिष्ठांसाठीं कोणत्या गोष्टींचा निषेध केला हें पाहतां येईल.

मद्यपानं महापापं नारीसंगस्तथैव च ।
तस्माद् द्वयं परित्यज्य तत्त्वनिष्ठो भवेन्मुनिः ।।

[अवधूतगीता ८-२६

पंच मकारांपैकीं ज्या दोन वाच्यार्थानें सदृश दिसणाऱ्या मकारांचा दत्तात्रेयांनीं अवलंब केला असें म्हटलें जातें त्याच दोन्ही वामाचारांचा निषेध ते करतात हें लक्षांत घेतलें पाहिजे. श्रीवासुदेवानंदसरस्वती म्हणतात :

धर्मातीत वागे हर । तो गुण घेती पामर ।
काळकूट जिरवी शंकर । मरे पामर त्या शिवतां ।।
त्यांचीं आचरणें प्रायः न घ्यावी । वचनें मात्र न टाळावीं ।
दोन्हीशीं योग्य तीं पाळावीं । सांभाळावीं धर्मार्हे ।।
काय सारिखा दिसला तरी । ज्ञानी अज्ञानी यांची न हो सरी ।
हें जाणिजे सूज्ञ चतुरीं । कुतर्क करी तो मूर्ख ।।

[दत्तमाहात्म्य ३.१०३, १०५, १०७

साधकाची निष्ठा आणि बुद्धीची झेप कशी आहे याची परीक्षा घेण्यासाठीं कांहीं वेळेला दत्तात्रेयांनीं असें दर्शन दिलेलें आहे असेंच म्हणावें लागेल. प्रखर तपस्येमुळें म्हणा किंवा गुरुकृपेमुळें म्हणा, दत्तात्रेयांचें दर्शन घडल्यावरहि भक्तांची परीक्षा अवधूतांनीं केलेली आहे. हातांतील मद्यघट पुढें करून, "आम्ही प्यालेले आहोंत तुम्हीहि पिऊं शकतां " अशी परीक्षाहि त्यांनीं घेतलेली आहे.

भगवान् परशुराम संवर्तमहामुनींच्या सूचनेप्रमाणें ज्यावेळीं दत्तात्रेयांच्या आश्रमांत मनःशांति प्राप्त व्हावी म्हणून येतात त्यावेळीं उभयतांत झालेला संवाद या दृष्टीनें मोठा उद्बोधक आहे. अवधूत म्हणतात :

स्वागतं भार्गव तव कच्चित्ते कुशलं स्थितम् ।।
तपसा ते जिता लोका बहवः पुण्यसंश्रयाः ।

त्वया भार्गववंशो वै नीतोऽत्युच्चपदं परम् ॥
तपसा विद्यया शक्त्या ब्रह्मचर्येण तेजसा ।
वदागमनकार्यं ते मादृशा न सदाश्रयाः ॥
बुद्धिभ्रंशकरी चेयं सुरा सज्जनगर्हिता ।
तादृशी वारयोषापि मयैतदुभयं श्रितम् ॥
[त्रिपुरारहस्य ६·१७, २०, २१, २८

"हे भार्गवा, तुझें स्वागत असो. सर्व कुशल आहेत ना? स्वतःच्या तपानें तूं अनेक पुण्यलोक संपादित केलेले आहेस. भार्गववंशाला तूं भूषण आहेस. इंद्रिय विजय मिळविल्याकारणानें, मला तर वाटतें कीं तूं जीवनमुक्त आहेस. या उलट बुद्धीचा भ्रंश करणारी, सज्जनांनीं गर्ह्य ठरविलेली जी सुरा तिचें नित्यसेवन मी करीत आहे. तेव्हां अशा माझ्याकडे तूं कां आला आहेस?"

पण संवर्तमुनीबरोबर झालेल्या संवादामुळें जामदग्न्यांची निष्ठा दृढ होती. ते म्हणतात, "शरणागत होऊन मी आपणांकडे आलों आहे. माझ्या श्रद्धेविषयीं आपण शंका घेऊं नये. संसारदावानलांत होरपळून निघणाऱ्या मला संवर्तमहामुनींनीं आपल्या चरणाकडे पाठविले आहे. तेव्हां हे दीनवत्सल जगद्गुरु माझ्यावर कृपा करावी." या परीक्षेला उतरल्यामुळेंच जगद्गुरु दत्तात्रेयांनीं परशुरामांना त्रिपुरारहस्याचें गुह्य सांगावयाचें ठरविलें आणि संवर्तमहामुनींच्या भविष्यवाणीप्रमाणें 'जगद्गुरु-समापत्तिम्' या पदापर्यंत भार्गवरामांना पोहोंचविलें. सर्वसाधारण साधकानें सद्गुरूजवळ जातांना कशी भूमिका ठेवावी याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. खुद्द देवांचीहि अशा प्रकारची परीक्षा अवधूतांनीं घेतलेली आहे. देवदानवांच्या घनघोर युद्धांत देव पराभूत झाले असतां बृहस्पतीच्या सांगण्यावरून ते गुरुदत्तांना जेव्हां शरण जातात तेव्हां त्या उभयतांमध्यें जो संवाद झाला आहे तो श्रीवासुदेवानंदसरस्वतींनीं फार मोठ्या मार्मिकतेनें वर्णन केला आहे. त्यांतलें दत्तात्रेयांचें वचन मी आतांच आपणांस सांगितलें पण देवांचें उत्तरहि मोठें चिंतनीय आहे.

भगवन् हे तव यथार्थ । जे मायारचित पदार्थ ।
ते व्यापिले हा उच्छिष्टाचा अर्थ । भ्रष्ट पदार्थ जीवत्व ॥

मद्य हे मोह प्रमाद । ह्याचा जीव घे स्वाद ।
तूं ईश्वर स्वच्छन्द । भेदपरिच्छेद तुज नाहीं ॥
तूं अनघ असती । अनघा हे असे तसी ।
तव शक्ती निश्चयेंसी । विद्या तुजसी अभिन्न हे ॥

[दत्तमाहात्म्य ५. ४८–५०

याप्रमाणें देवांची भक्ति पाहून दत्तात्रेय अवधूतांनीं त्यांना अभय दिलें. व युद्धास जाण्यास सांगितले. जंभासुरादि दानव देवांचा पाठलाग करीत दत्तात्रेयांच्या आश्रमीं आले व अवधूतांच्या मांडीवरील तरुण स्त्रीला भुलून तिलाच उचलून नेण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. दैत्यांचें पाप शींगेवर जाण्याचें हेंच शेवटचें कृत्य होतें व त्यामुळें त्यांचा नाश ओढवला.

अनेक संतमहंतांनाहि दत्तात्रेयांनीं ज्या ज्या वेळीं दर्शन दिलेलें आहे त्या त्या वेळीं अशाच प्रकारचें बाह्यदृष्ट्या वामाचाराचें प्रदर्शन करुन त्यांना आपणांपासून दूर लोटण्याचा प्रयत्न केला आहे.

कलियुगांत उपासनेच्या दृष्टीनें तीन देवता प्रधान आहेत. त्या म्हणजे दत्तात्रेय, गणपति व देवी. या तीन्ही देवता वरवर पहाणारास अगदीं भिन्न वाटल्या तरी त्यांच्यांतहि एक तत्त्वसाम्यता आहे आणि तें म्हणजे ‘ त्रित्व ’. गणेशदेवता ही प्रणवरूप आहे. त्यांत अ + उ + म् हें त्रित्व आहे. देवी ही त्रिपुरा आहे हें आपण जाणतांच. तिच्यापासूनच अंशरूपानें ब्रह्मा, विष्णु व महेश हे प्रकट झाले, आणि त्या तिहींचें एकीकरण आपण दत्तात्रेयांचें ठिकाणीं पाहतो.

त्रिगुणात्मक त्रैमूर्तीची शिकवणहि त्रिविध दिसतें. ज्ञान, योग व भक्ति या तीन्हीं मार्गांनीं दत्तात्रेयांनीं आपल्या शिष्यांना किंवा भक्तांना उपदेश केलेला आढळतो. या शिकवणीची कल्पना जे निरनिराळे संवाद उपासकांच्या बरोबर दत्तात्रेयांचे झालेले आहेत त्यावरून येऊं शकेल. खुद्द स्वतःची माता अनसूया, यदु, अलर्क, सहस्रार्जुन, भार्गवराम, प्रल्हाद यांच्या बरोबरचे संवाद प्रसिद्ध आहेत. केवळ नुसत्या यादीवरूनच आपणांला कल्पना येईल कीं, कोणत्या दर्जाची ही भक्त-

मंडळी आहेत. सर्वच संवादांचें तपशीलवार विवेचन वेळेअभावीं अवघड आहे म्हणून अगदीं थोडक्यांत त्यांपैकीं कांहींचें विवेचन मी करीत आहे.

अनसूयामातेनें श्रीगुरुंना ज्ञानप्राप्तीसाठीं चाळीस प्रश्न विचारलेले दिसतात. अगदीं पहिलाच प्रश्न 'ब्रह्म कशास म्हणावें ? आणि तें कसें ओळखावें ?' हा आहे. करून अकर्ता, भोगून अभोक्ता, निर्गुण, निरामय अशा अगोचर ब्रह्माची महति सांगत सांगत सद्गुरुंना शरण गेल्याशिवाय तें समजणार नाहीं असें अवधूत म्हणतात. तपाविषयीं खुलासा करतांना दत्तात्रेय म्हणतात, 'जगांत वावरत असतांनाहि निःसंगता बाणणें, विषयवासनांचा अव्हेर करणें हें तपाचें लक्षण होय. ज्यानें अपरोक्ष ज्ञान प्राप्त होतें तें उत्कृष्ट तप होय'. 'खरें सुख कोणतें ?' असें अनसूयेनें विचारलें असतांना 'विषयोपभोगापासून प्राप्त होणारें सुख हें नश्वर आहे तर सत्कर्मानें तसेंच दया, क्षमा, शांति इत्यादि गुणांनीं जें सुख प्राप्त होईल तें खरें होय. योगीजनच असें सुख मिळवूं शकतात' असें दत्तात्रेयांनीं उपदेशिलें आहे. 'उपास्य कोणतें असावें ?' याला दत्तात्रेयांचें उत्तर मोठें चिंतनीय आहे. 'ब्रह्माविष्णुमहेशादि देवांचाहि जो देव त्याची प्राप्ती करून देणारे जे सद्गुरु तेच श्रेष्ठ उपास्य होत.'

सहस्रार्जुनाला उपदेश करीत असतांना, आत्मस्वरूप जर जाणायचें असेल तर प्रथम शास्त्रांची मदत घ्यावी असें अवधूत सुचवितात. माया ही परमेश्वराची शक्ति आहे आणि ज्याप्रमाणें शक्ति व शक्तिमान् हे अभेद्य आहेत त्याप्रमाणें परमेश्वर आणि पारमेश्वरी माया अभेद्य आहेत. शेवटीं योगाच्या यमनियमादि आठ अंगांचें विवेचन करून अवधूत सहस्रार्जुनावर कृपा करतात.

अलर्काला केलेला तत्त्वबोध हाहि अशाच प्रकारचा आहे. अणिमादि अष्ट महासिद्धींचें विवेचन करून त्या प्राप्त झाल्या तरी त्यांत गुंतून जातां कामा नये हें शेवटीं त्यांनीं अलर्काला पटवून दिलें.

मान विषासमान, तर अपमान अमृतासारखा मानावा; स्वच्छ दिसेल तेथेंच पाऊल ठेवावें; शास्त्रशुद्ध बोलावें; अर्धपोटीं जेवावें; संग्रहाकडे दृष्टी ठेवूं नये

आणि जनांत उदासीन असावें हें त्यांनीं अलर्काला केलेल्या उपदेशाचें सार आहे. अलर्काला उपदेश करीत असतांना जणुं कांहीं सर्वसाधारण मानवालाच अवधूतांनीं हा उपदेश केला आहे असें वाटतें.

दत्तभार्गवसंवादांत शिष्याच्या योग्यतेनुरूप अवधूतांनीं आणखीहि कांहीं रहस्य उकलण्याचा प्रयत्न केला आहे. महात्रिपुरासुंदरी हीच जगाची आदि-कारण कशी आहे, तिच्याच लीलेनें सारा व्यापार कसा चालू आहे, तिची प्राप्ति व तिच्याशीं ऐक्य हें साधकाचें ध्येय कसें असावयास हवें, व त्यासाठीं मार्ग कोणता याचें विवेचन त्रिपुरारहस्यांत आढळून येतें. एका विशिष्ट दीक्षाविधीनें सद्गुरूंकडून या विद्येची प्राप्ती साधकाला होत असते. अवधूत दत्तात्रेयांनीं संवर्तमहामुनींना अशीच दीक्षा दिलेली असावी असें दिसतें. त्रिपुरारहस्याच्या सुरवातीला भार्गवांना संवर्तमुनींचें जें पहिलें दर्शन घडलें त्यांतील वर्णनावरून त्या मुनींच्या अवस्थेची कल्पना येते.

दृष्टस्तेजोराशिमयो ज्वलदग्निगिरिर्यथा ।
पुष्टसुन्दरसर्वाङ्गः फुल्लपङ्कजलोचनः ॥
मलिनाङ्गो मुक्तकेश उन्मत्तचरितोऽपि यः ।
महापुरुषवद् दृष्टो महात्मा मुनिराट् कविः ॥
दृष्ट्वैवं भार्गवो विप्रं त्यक्तलिङ्गाश्रमादिकम् ।
दिगम्बरं पङ्कदिग्धं गन्धसिन्धुरवत्स्थितम् ॥

[त्रिपुरारहस्य ४, १४–१६

ज्यांचें अंग मलिन झालेलें आहे, ज्यांचा केशभार विखुरलेला आहे, ज्यांनीं आश्रमादिकाच्या खुणा सोडून दिलेल्या आहेत अशी ती तेजःपुंज दिगंबर मूर्ति होती. अशा महात्म्यांना स्वतःच्या मनाची व्यथा सांगतांना जामदग्न्य आपल्या क्षत्रियसंहारसंदर्भात म्हणतात कीं,

क्रोध एव तपोमृत्युः क्रोधान्नश्यति वै तपः ।
क्रुद्धस्य दूरतो याति विचारः सत्त्वबुद्धिजः ॥

[त्रिपुरारहस्य ४. ४

क्रोध हा तपोमार्गामध्यें कसा आड येतो याचें आत्मनिवेदन परशुरामांनीं केलेलें आहे. दाशरथी रामाच्या भेटीच्या वेळीं मी क्रोधानें अनावर झाल्यामुळें रामबाणांनीं तपप्रभावानें मिळविलेल्या अनेक लोकांच्या गति अवगुंठित होऊं दिल्या असें सांगून साधनेच्या मार्गांत क्रोध आला तर केवढी किंमत द्यावी लागते हेंच जामदग्न्यांना आपणांस पटवून द्यावयाचे आहे; इतकेंच काय, पण 'क्रोध एव तपोमृत्युः' असें ते म्हणतात. भार्गवरामांनीं केलेलें हें क्रोधाविषयीचें विवेचन सर्वसाधारण प्राणिमात्राच्या शिकवणीसाटींच आहे. संवर्तमहामुनि जामदग्न्यांना अवधूतांच्याकडे पाठवतात आणि त्यामुळें या विश्वगुरुंच्याकडून जामदग्न्यांना श्रीविद्येचें रहस्य खुलें होतें.

भागवतांतील एकादशस्कंधांत दत्तात्रेयांच्या २४ गुरुंचें प्रकरण आहे. सर्व चराचर विश्व हाच साधकांचा गुरु आहे असें अवधूतांना सूचित करावयाचे आहे असें वाटतें. साधनेच्या वाटचालींत साधकाला आवश्यक असलेल्या गुणांचा निर्देश या प्रत्येक गुरुच्या द्वारें कसा केला आहे हें आपण आतां पाहूं या —

सन्ति मे गुरवो राजन् बहवो बुद्ध्युपाश्रिताः ।
यतो बुद्धिमुपादाय मुक्तोऽटामीह ताञ्छृणु ॥
पृथिवी वायुराकाशमापोऽग्निश्चन्द्रमा रविः ।
कपोतोऽजगरः सिन्धुः पतंगो मधुकृद् गजः ॥
मधुहा हरिणो मीनः पिङ्गला कुररोऽर्भकः ।
कुमारी शरकृत् सर्पः ऊर्णनाभिः सुपेशकृत् ॥
एते मे गुरवो राजंश्चतुर्विंशतिराश्रिताः ।
शिक्षा वृत्तिभिरेतेषामन्वशिक्षमिहात्मनः ॥

[श्रीमद्भागवत स्कंद ११.७.३२–३५

दत्तात्रेयांनीं केलेले गुरु व त्या गुरुपासून घेतलेले गुण —

१ पृथिवी : सहिष्णुता.
२ वायु : अनासक्ति.
३ आकाश : अलिप्तता, व्यापकत्व.

४	आप	: स्निग्धता, माधुर्य, निर्मलता.
५	अग्नि	: तेजस्विता, मलनाश, श्रेयस्करता.
६	चंद्रमा	: उपाधिरहितत्व.
७	रवि	: स्थितप्रज्ञता, दुर्गुणांचा परिहार, सद्गुणांचा उदंड व्यवहार.
८	कपोत	: संगाचा त्याग.
९	अजगर	: यदृच्छालाभसंतोषत्व.
१०	सिंधु	: अक्षुब्धता, प्रसाद, गांभीर्य, लाभालाभविवेक, समानदृष्टि.
११	पतंग	: परित्याग.
१२	मधुकृत्	: माधुकरीवृत्तीनें परिग्रह.
१३	गज	: वैषयिक गोष्टींचा त्याग.
१४	मधुहा	: अंग्रंभुक्त्वं
१५	हरिण	: असदालापवर्जित्व.
१६	मीन	: संयम.
१७	पिंगला	: स्वोद्धार.
१८	कुरर	: असंग्रह, अलुब्धत्व.
१९	अर्भक	: मानापमानातीत्व.
२०	कुमारी	: एकांतरुचि.
२१	शरकृत्	: एकाग्रता.
२२	सर्प	: अपरिग्रह.
२३	ऊर्णनाभि	: ईश्वराचें ध्यान.
२४	सुपेशकृत्	: तद्रूपता.

श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या 'श्रीदत्तात्रेयषोडशावतारजयंतिकल्प' या ग्रंथांत श्रीदत्तात्रेयांच्या सोळा अवतारांचें त्रोटक वर्णन दिलें आहे तेहि असे आहेत :

अवताराचें नांव	प्राकट्य मास व तिथि	वार	नक्षत्र
१. योगिराज	कार्तिक शु. १५	बुधवार	कृत्तिका
२. अत्रिवरद	कार्तिक व. १	गुरुवार	रोहिणी
३. दत्तात्रेय	कार्तिक व. २	शुक्रवार	मृगशीर्ष

४.	कालाग्निशमन	मार्गशीर्ष	शु. १४	बुधवार	रोहिणी
५.	योगिजनवल्लभ	मार्गशीर्ष	शु. १५	गुरुवार	मृग
६.	लीलाविश्वंभर	पौष	शु. १५	बुधवार	पुष्य
७.	सिद्धराज	माघ	शु. १५	गुरुवार	मघा
८.	ज्ञानसागर	फाल्गुन	शु. १०	रविवार	पुनर्वसु
९	विश्वंभरावधूत	चैत्र	शु. १५	मंगळवार	चित्रा
१०.	मायामुक्तावधूत	वैशाख	शु. १४	बुधवार	स्वाति
११.	मायामुक्तावधूत	ज्येष्ठ	शु. १३	शुक्रवार	स्वाति
१२.	श्रीआदिगुरु	आषाढ	शु. १५	शनिवार	उत्तराषाढा
१३.	शिव	श्रावण	शु. ८	सोमवार	स्वाति
१४.	देवदेव	भाद्रपद	शु. १४	शुक्रवार	शततारका
१५.	दिगंबर	अश्विन	शु. १५	बुधवार	अश्विनी
१६.	श्यामकमललोचन	कार्तिक	शु. १२	बुधवार	रेवती

यावरून मानवाच्या उद्धाराचें कार्य अविच्छिन्नपणें निरनिराळ्या अवताररूपानें अवधूत दत्तात्रेयांनीं चालविलेलें आहे हें दिसतें.

त्यांनीं उपदिष्ट केलेल्यामध्यें निरनिराळ्या दर्जाच्या विभूति दिसतात. कृतयुगांत दत्तात्रेयांनीं यदूला पावन केलेलें आहे आणि प्रल्हादालाहि मिळालेलें ज्ञान यदु-कडूनच दिलें गेलें आहे. त्रेतायुगांतील कार्य तर आणखी भरीवच दिसत आहे. कार्तवीर्यार्जुनाला तो शरण आला असतां उपदेश केला आहे. परशुराम हे तर त्यांचे परम शिष्यच आहेत. तेंच कार्य त्यांनीं अखंड चालविलें आहे. दाशरथी रामांना दत्तात्रेयांचें दर्शन घडलेलें आहे. श्रीकृष्णानेंहि आपल्या कुलाच्या मूळ पुरुषाचे, धर्मात्मा यदूचे परमसद्गुरु असा अवधूतांचा उल्लेख केला आहे. मत्स्येन्द्रनाथ व गोरखनाथ यांची भेट दत्तात्रेयांशीं झालेली आहे. श्रीमदाद्य-शंकराचार्य यांनींहि दत्तात्रेयांची आराधना केल्याचा उल्लेख गुरुलीलामृतामध्यें आहे.

ते शंकराचार्य पर्वतीं । श्रीगुरुदत्तात्रेयासीं आराधिती ।
दत्तप्रसादें विजय ख्याती । स्वल्पवयांत लाधले ।।

[गुरुलीलामृत १२. १०३

श्रीमद्शंकराचार्यांनीं केलेल्या दत्तात्रेयसहस्त्रनामांत अवधूतांना 'कुलश्रीमंत्रजापकः' म्हटलें आहे. यावरुन दत्तात्रेयांचा श्रीविद्येशी कोणता संबंध आहे याचें एकाच नामांत त्यांनीं प्रकटीकरण केलें आहे असा स्पष्ट अर्थ होतो.

संतकवींच्यापैकीं एकनाथ व दासोपंत यांना दत्तात्रेयांनीं दर्शन दिलें असे उल्लेख मिळतात. समर्थ रामदासांच्याकडे तर दत्तात्रेयांनीं पाहुणचार घेतल्याचे आपणांस माहीत आहेच. दत्तात्रेयांच्या दर्शनाचा लाभ ज्यांना झाला त्यांचीं अनेक उदाहरणें आपणांस देतां येतील.

या निमित्तानें अवधूतांनीं जो उपदेश केला आहे तो दत्तात्रियप्रणीतग्रंथ 'अवधूतोपनिषद्' आणि 'जाबालोपनिषद्' या नांवांनीं उपलब्ध आहेत. परशुरामांना श्रीविद्येचें रहस्य सांगत असतांना 'त्रिपुरोपास्तिपद्धति' हा ग्रंथ निर्माण झाला. परशुरामांनीं त्याचेंच सुलभीकरण कल्पसूत्रानें केलें. 'अवधूतगीता' आणि 'जीवन्मुक्तगीता' या दत्तात्रेयप्रणीत दोन गीता आहेत. म्हैसूरचे महाराज जयचामराजेन्द्र वाडियार यांनीं या दोन्ही गीतावर फारच सुंदर श्रद्धायुक्त ग्रंथ लिहिला आहे आणि दत्तात्रेयांच्या ठिकाणीं असलेली आपली अनुपम निष्ठा व्यक्त केली आहे. चोवीस संस्कृत श्लोकांच्या या गीतेचा श्री. रा. चिं. ढेरे यांनीं आपल्या दत्तसांप्रदायाचा इतिहास या अभ्यासपूर्ण संकलन केलेल्या ग्रंथांत मराठी अनुवाद दिलेला आहे. सुरवातीला नमन करून बहुतेक श्लोकांतून त्यांनीं जीवन्मुक्तावस्थेचें वर्णन केलें आहे. सुरवातीस मूळ संस्कृत श्लोक प्रथम देऊन श्री. ढेरे यांचा अनुवाद त्यानंतर मी आपणांस सांगणार आहे.

जीवन्मुक्तिश्च या मुक्तिः सा मुक्तिः पिण्डपातने ।
या मुक्तिः पिण्डपतने सा मुक्तिः शुनि सूकरे ॥

[जीवन्मुक्तगीता २

तिये नांव जीवनमुक्ति । जियेची सदेही अनुभूति ।
पिंडपतनानंतर मुक्ति । श्वानसूकर अनुभवति ॥

पार्थिव देहांत वावरत असतांनाच ज्याला मुक्तावस्था प्राप्त झाली आहे तोच खरा जीवन्मुक्त होय. पार्थिव देहाचें विसर्जन म्हणजे मुक्ति नव्हे. नाहीं तर ती श्वान-

सूकरांच्या मुक्तिसारखीच होईल. देहधारण केला असतांनाच जीवन्मुक्त अवस्था येऊं शकते आणि ती अवस्था सर्वसाधारण पार्थिव देह विसर्जनाच्या कल्पनेपेक्षां कशी निराळी आहे हें जीवन्मुक्तच अनुभवूं शकतात. क्वचित् प्राप्त होणारी अशी ही अवस्था असून योग्यांना व सिद्धांनाच तें भाग्य लाभतें. अर्थात् जीवन्मुक्तावस्थेची तत्त्वप्रणाली वेदोपनिषदादि वाङ्मयांतूनहि आपणाला धुंडाळतां येते. उपाधीपासून विमोचन हेंच सदेह मुक्तावस्थेचें लक्षण होय. साधकाच्या मनोठेवणीचें मोठें मार्मिक वर्णन करून त्यांतूनहि एका गीतांत त्यांनीं जीवन्मुक्तावस्था वर्णन केली आहे.

कर्मेन्द्रियपरित्यागी ध्यानवर्जितचेतसः ।
आत्मज्ञानी तथैवैको जीवन्मुक्तः स उच्यते ॥

[जीवन्मुक्तगीता ८

कर्मेन्द्रियें व्यापाररहित । आणि तैसेंचि ध्यानवर्जित चित्त ।
करूनि आत्मानुभवीं जो स्थित । तया नांव जीवन्मुक्त ॥

माणसाचें मन हें बंधनाच्या पलीकडे असतें. पापणीचें पातें लवण्यापूर्वीं त्याला पृथ्वीप्रदक्षिणा करतां येते. वैचित्र्यानें भरलेल्या या जगांत मानवाच्या मनाच्या उड्या अगर तो करीत असलेल्या क्रिया या तितक्याच विचित्र असतात. ज्या वेळेला हे सर्व मनादि इंद्रियाचे व्यापार स्थिरावतात आणि मन निर्विकार होतें त्याच वेळेला तो जीव आत्मानुभावामध्यें रंगूं लागतो. अशी स्थिति प्राप्त होणें हीच जीवन्मुक्तावस्था.

शारीरं केवलं कर्म शोकमोहादिवर्जितम् ।
शुभाशुभपरित्यागी जीवन्मुक्तः स उच्यते ॥

[जीवन्मुक्तगीता ९

केवळ शरीरपरिरक्षणार्थ । कर्म शोकमोहादिवर्जित ।
शुभाशुभ परित्याजित । तया नांव जीवन्मुक्त ॥

शोक आणि मोह यांपासून जो मोकळा आहे, शुभाशुभाचा ज्याला विषाद आणि आनंदहि नाहीं तो जीवन्मुक्त होय. ही शिकवण देत असतांना श्रुतिस्मृतींतील

शिकवणच दत्तात्रेयांनीं पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. अशा रीतीनें प्रत्येक गीतांतून जीवन्मुक्तावस्थेची महती गात गात व मार्ग सांगत सांगत अवधूत साधकाच्या मनाची बैठक तयार करून घेतात असेंच म्हणावें लागेल.

अभ्यासे रमते नित्यं मनो ध्यानलयं गतम् ।
बन्धमोक्षद्वयं नास्ति जीवन्मुक्तः स उच्यते ।। १६ ।।
[जीवन्मुक्तगीता १६

जयाचें मन अभ्यासीं रमतें । तैसेंचि ध्यानीं लय पावतें ।
जया बंधमोक्षाचें द्वंद्व नसतें । तया नांव जीवन्मुक्त ।।

साधकाची स्थिति कोणती व्हावयास पाहिजे याचें अगदीं कमी पण वेचक शब्दांत अत्यंत मार्मिक वर्णन आपण या गीतांत पाहूं शकतों. किंबहुना तुम्ही आम्ही या अवस्थेपर्यंत जाण्याची खटपट करावयास हवी. सद्गुरूंची कृपा त्यासाठीं आपणांवर व्हावयास पाहिजे. त्यासाठीं आवश्यक असणारी मनाची ओढ जरी यांतून निर्माण झाली तरी सद्गुरूंना त्यांत समाधानच वाटणार आहे.

' आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां ' ही तुकोबारायांची उक्ति आपणां सर्वांच्या परिचयाची आहे. अगदीं साध्या व सोप्या शब्दांतून स्वतः तुकोबाराय ज्या जीवन्मुक्त अवस्थेंत रममाण झाले होते त्याचें यथार्थ वर्णन केवळ चार शब्दांत त्यांनीं केलें आहे. मृत्यु म्हटला कीं, व्यवहारांत गुरफटलेल्या मनाची काय धडपड होते हें आपण पाहतोंच. या सर्व उपाधींचा नाश करण्याएवढें साधकाचें मनोबल वाढविणें आणि त्याला उच्चतर अवस्थेंत नेणें हें सद्गुरुंनाच शक्य आहे.

अवधूतगीतेची बैठकहि अशीच उच्चतर आहे. वेद व उपनिषदें यांचें सम्यग् ज्ञान असल्याशिवाय अवधूतगीतेचा विषय आकलन होणें जड जाते. कारण वेदोपनिषदांतील शिकवणुकीचें विवेचन हाच अवधूतगीतेचा प्रधानहेतु दिसतो. भाषेची मांडणी किंवा शब्दाचा अर्थ सकृत्दर्शनी साधा व सोपा वाटला तरी मननानंतर अवधूतगीता ही अनुभूतीच्या भक्कम पायावर उभारलेली एक भव्य इमारत आहे हें लक्षांत येतें. एकाच वाक्यांत वर्णन करावयाचें झाल्यास तत्त्ववेत्त्यानें गायिलेलें अवधूतगीता हें ब्रह्मविद्येचें किंवा श्रीविद्येचें गीत आहे असें म्हणतां येईल.

विशुद्ध ज्ञानानेंच श्रद्धा वाढीला लागते. सत्याविषयींच्या श्रद्धेनें ज्ञानाबद्दलची श्रद्धा दृढ होत जाते, कारण सत्य आणि ज्ञान हे अभेद्य आहेत. तेंच अवधूततत्त्व आहे. अवधूतगीतेंत दत्तात्रेयांनीं गायिलेली तत्त्वप्रणाली जीवन्मुक्तावस्था विशुद्ध ज्ञानामुळें कशी प्राप्त होते हें पटविण्यासाठींच आहे. सर्वशक्तिमान्' होणें हा त्या गीताचा कणा आहे आणि त्या आधारावर: पूर्णत्वप्राप्तीची गुरुकिल्ली साधकाला शोधावयाची आहे. 'सर्वशक्तिमान्' 'जीवन्मुक्त' किंवा 'पूर्ण' असे भगवान् दत्तात्रेय आहेत. निराकाराला आलेला तो आकार आहे. त्यांच्याच कृपेनें हें साधणार आहे. जीवन्मुक्तावस्था प्राप्त झालेल्या भाग्यवंताच्या मनःस्थितीच्या आनंदाचें वर्णन तुकोबारायांनीं फारच सुंदर केलें आहे.

आम्ही मेलों तेव्हां देह दिला देवा ।
आतां करूं सेवा कोणाची मी ।। १ ।।
सूत्रधारी जैसा हालवितो कळा ।
तैसा तो पुतळा नाचे छंदे ।। २ ।।
बोलतसें जैसें बोलवितो देव ।
मज हा संदेह कासयाचा ।। ३ ।।
पाप पुण्य ज्याचें तोचि जाणें कांहीं ।
संबंध हा नाहीं आम्हासवें ।। ४ ।।
तुका म्हणे तुम्ही आइका हो मात ।
आम्ही या अतीत देहाहूनि ।। ५ ।।

[तुकारामगाथा ३५५८

आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां ।
तो जाला सोहळा अनुपम्य ।। १ ।।
आनंदें दाटली तिन्हीं त्रिभुवनें ।
सर्वात्मकपणें भोग झाला ।। २ ।।
एकदेशी होतों अहंकारें आथिला ।
त्याच्या त्यागें जाला सुकाळ हा ।। ३ ।।
फिटलें सुतक जन्ममरणाचें ।
मी माझ्या संकोचें दुरी जालों ।। ४ ।।

नारायणें दिला वसतीस ठाव ।
ठेवूनिया भाव ठेलों पायीं ॥ ५ ॥
तुका म्हणे दिलें उमटूनि जगीं ।
घेतलें तें अंगीं लावूनिया ॥ ६ ॥
[तुकारामगाथा ३५५९

बुद्धिपुरवासियांच्या दृष्टीनें दत्तसंप्रदायाचा विचार करावयाचा झाला तर अवधूत दत्तात्रेय, श्रीपादश्रीवल्लभ, नरसिंहसरस्वती, स्वामीसमर्थ ही परंपरा आपल्या डोळ्यासमोर येते. श्रीमद्दत्तात्रेयांचा श्रीपादश्रीवल्लभ अवतार. श्रीपादांचें जन्मस्थान पीठापूर, तर दत्तात्रेयांचा सनातन वास पीठापुरींच असल्याचा उल्लेख गुरुचरित्रांत सांपडतो.

पीठापुरीं दत्तात्रेयदेवें । वास केला सनातनें ॥
[गुरुचरित्र १५ . ८६

हे महान् तपस्वी जगद्गुरु होतील असें जातक ब्राह्मणांनीं त्यांचें लहानपणींच वर्तविलें होतें. त्यांच्या विवाहाचा विचार सुरू झाला तेव्हां ते म्हणाले, " योगश्री-वांचून आम्हाला दुसऱ्या स्त्रीशीं कर्तव्य नाहीं. "

कराल विवाह माझा तुम्ही । सांगो ऐका विचार आम्ही ।
वैराग्यस्त्रीसंगे असेन मी । काम्य आमुचे तियेजवळी ॥
या स्त्रियेवांचूनि आणीक नारी । समस्त जाणा मातेसरी ।
जरी आणाल ते सुंदरी । वरीन म्हणे तये वेळीं ॥
आपण तापसी ब्रह्मचारी । योगश्रियावांचोनि नारी ।
न लगती हा बोल निर्धारी । श्रियावल्लभ नाम माझें ॥
[गुरुचरित्र ५. ५३-५५

वरील ओव्यांमध्यें श्रीपादांनीं ' श्रीवल्लभ ' हेंच नांव धारण करण्यांतील हेतु स्पष्ट होतो. श्रीपादांनीं कुरवपुरीं कृष्णाकांठीं येण्यापूर्वी जगन्नाथपुरी, काशी, बद्रि-केदार, गोकर्ण व श्रीशैल या ठिकाणच्या यात्रा केल्या व हीं सर्व क्षेत्रें शक्तिपीठें म्हणून प्रसिद्ध आहेत.

श्रीपादांच्या नंतर झालेला नरसिंहसरस्वती हा दुसरा अवतार. जन्मतःच फक्त ॐ कार त्यांचें मुखांतून बाहेर पडत असे. उपनयन होतांच चारहि वेद त्यांना उत्स्फूर्त झाले. वेदांवर चर्चा करण्यासाठीं आलेल्या मूर्ख ब्राह्मणांना वेदांची महती सांगून त्यांना हतबल केल्याचा उल्लेख गुरुचरित्रांत मिळतो. वाडी, औदुंबर व गाणगापूर हीं तपाचरणासाठीं त्यांनीं निवडलेलीं स्थानें होत. पैकीं, कृष्णापंचगंगा संगमाजवळ कोल्हापूर हे महाशक्तिपीठ आहे. श्रीक्षेत्र औदुंबर-नजिक श्रीभुवनेश्वरी महापीठ आहे. भीमाअमरजासंगमावर श्रीगुरूंच्या तप—श्चर्येच्या ठिकाणाजवळच भस्माचा डोंगर आहे. यावरून दत्तात्रेयांच्या वरील दोन अवतारांचा शक्तिपीठाशीं असलेला संबंध व त्यांच्या यज्ञप्रियतेची साक्ष पटते. श्रीदत्त दिगंबर, अर्थात् कौपीनहि परिधान न करणारे, यज्ञोपवीतधारी दिसतात. यज्ञसूत्र धारण करण्यांतला उद्देश त्यामुळें लक्षांत येऊं शकतो.

माहुरपुरांत विष्णुदत्त हे दत्तात्रेयांचे एक कर्मनिष्ठ शिष्य वेदविहित कर्मानुष्ठान करीत असत. त्यांना दत्तात्रेयांच्या दर्शनाची तळमळ लागली होती. परंतु पुष्कळ काळपर्यंत त्यांची मनीषा पूर्ण झाली नाहीं. सतत १२ वर्षें काकबलि खाऊन संतुष्ट झालेल्या पिशाच्यानें त्यांना श्रीदत्तात्रेयांचें दर्शन करवून देण्याचें कबूल केलें. श्रीदत्तात्रे-यांची यज्ञप्रियता पिशाच्यासहि माहीत होती. त्यानें विष्णुदत्ताला उपदेश केला कीं, ' अमावस्येष्टिनिमित्तानें पितृश्राद्धास येण्यास तूं दत्तात्रेयांना विनंति करशील तर ते आमंत्रण नाकारणार नाहींत; व तुझ्या इच्छेप्रमाणें श्रीदत्तात्रेय तुझ्या येथें भोजन करतील.' पिशाच्याच्या उपदेशाप्रमाणें विष्णुदत्तानें केल्यावर त्याला श्रीदत्तात्रेयांचें दर्शन लाभलें.

श्रीनृसिंहसरस्वतीचें बहुधान्यनाम संवत्सरीं श्रीशैलपर्वतावर प्रयाण, आणि सुमारें ४०० वर्षानंतर त्याच संवत्सरांत कर्दलीवनांतून स्वामीसमर्थांचें प्राकट्य हा केवळ योगायोग नव्हे. श्रीशैल हे श्रीचक्रानें धारण केलेलें अचल स्वरूप व तेथें वास्तव्यहि भ्रमरांबेचें. स्वामींनीं आपलें निर्याण स्थान पसंत केलें तें श्रीशैलपति अर्थात् मल्लिकार्जुन यांच्या मंदिराचे शेजारींच. दत्तात्रेयांच्या दिनचर्येतील स्नानाचें स्थान जें वाराणशीक्षेत्र त्याचे उत्तरेस स्वामीसमर्थ ध्यानाधिस्थ होते आणि प्रगट झाले तेहि दत्तात्रेय ज्या स्थळीं चंदन लावतात त्या पंढरपूरशेजारीं मंगळवेढ्यासच.

श्री. चिंदबर दीक्षितांनीं यज्ञ केला त्या वेळीं हविर्द्रव्य-तूप कमी पडणार ही भीति निर्माण झाली असतां स्वामीसमर्थमहाराजांनीं तें पुरविलें. कोणतेंहि चरित्र अथवा चारित्र्य निजमुखानें सहसा न उच्चारणारे स्वामीसमर्थ चिंदबर दीक्षितांचा, गौरवपूर्वक उल्लेख करून त्यांनीं केलेला यज्ञ व त्यांतील स्वतःची कामगिरी ते स्वतःच सांगत असत हें लक्षांत घ्यावें. महासमाधिपूर्वीं शेवटच्या आठवड्यांत घडलेली अद्‌भुत घटना म्हणजेच त्यांच्या यज्ञप्रियतेचें मूर्तिमंत स्वरूपच होय. त्यावेळीं श्रीसमर्थांनीं एका जंगमाच्या मठांत तेथील स्थापित लिंगावर वेदी रचून स्वतःच विधिपूर्वक यज्ञ केला व अशा प्रकारें यज्ञसंस्थेचें महत्व प्रस्थापित केलें. प्रस्तुत यज्ञानिमित्त शेंकडों नारळ, तूप अजमासें पक्के ५ शेर व साखर पक्के ५ शेर गहूं, तांदूळ, माळा, फुलें, शेंकडों गोवऱ्या व इतर सामग्री सेवेकऱ्यांना आज्ञा करून स्वतःच जमविलेली. इतकेंच नव्हें तर आपण करीत असलेल्या यज्ञाची महती त्यांनीं सर्व भक्तांना कथन केली.

गाणगापूर हे गंधर्वपूर या नांवानेंहि लोकविख्यात आहे. गंधर्वतंत्रांत नमूद केल्याप्रमाणें गंधर्व शब्दाचा अर्थ ' अखिलाद्य ' असा आहे.

> गीयते सर्वतन्त्राणामखिलाद्यो यतस्त्विह ।
> तेनायं नृपशार्दूल तन्त्रो गन्धर्व उच्यते ॥

[गंधर्वतंत्र १. १२

आणि म्हणून गाणगापूर हें सर्वांच्या अगोदरचें म्हणजे श्रीचें वास्तव्य असणारें पुर आहे हें दिसून येईल आणि यामुळें दत्तात्रेय आणि परशुराम यांचा संबंध गंधर्वतंत्रावरून सिद्ध होतो.

तुळजापूरचें महाशक्तिपीठ येथून जवळच आहे. भवानीचीं स्वयंभू स्थानें आणि श्रीयल्लमा रेणुकादेवीची स्थानें अक्कलकोटच्या परिसरांत ठिकठिकाणीं आढळतात. अक्कलकोट पंचक्रोशींतील रामलिंग, किणीला रामतीर्थ, जवळग्याला रामपूर, इटगीला रामपूर अशीं तीर्थस्थानें हीं कशाचीं प्रतीकें आहेत हें प्रज्ञापुरवासीयांना सांगणें न लगे.

' नंदगोपकुले जाता यशोदागर्भसंभवा ' देवी कात्यायनीनें श्रीकृष्णाचें पुरुषरूप धारण करून कुरुक्षेत्रावर जी गीता अर्जुनाला सांगितली त्या गीतेचा पाठ करण्यास स्वामीसमर्थ भाविकांना सांगत असत. इतकेंच नव्हे तर स्वामीसमर्थांनीं महा-समाधिसमयीं, ' अनन्याश्चिन्तयन्तो माम् ' हें गीतावचनच तीन वेळां उच्चारलें. यावरुन अक्कलकोट हे नांवानें विद्यानगर रहावें एवढीच त्यांची इच्छा नव्हती तर ती खऱ्या अर्थानें विद्येची नगरी व्हावी असाच त्यामागें संकेत असला पाहिजे.

अक्कलकोटच्या परिसरांतून वाहणारी नदी हरिणी या नावानेंच ओळखिली जाते. मध्वसांप्रदायी श्रीपरशुरामांना हरिणीपति म्हणून ओळखतात हे सर्वांना माहीत आहेच आणि ' श्रीर्धृत्वा हारिणीरूपमरण्ये संचचार ह ' हें श्रीसूक्तभाष्यांत उद्धृत केलेलें पुराणांतील विधानहि आपणास माहीत आहे. यावरुन हरिणीरूपधरा श्रीविद्येचें वास्तव्य या ठिकाणीं आहे असें म्हटल्यास अतिशयोक्तीचें होणार नाहीं; आणि स्वामी समर्थांनीं हें स्थान आपल्या वास्तव्यासाठीं कां पसंत केलें याचाहि उलगडा होईल. अक्कलकोट हे अवधूतपीठ तसेच शक्तिपीठ आहे हे सिद्ध झाल्यानंतर अवधूत परंपरा, श्रीस्वामीसमर्थ व परशुराम यांचा अन्योन्य संबंध चिंतनीय ठरतो. तुमचें आमचें परम भाग्य कीं, परमसद्गुरु श्रीगजाननमहाराज यांच्या कृपेनें त्यासंबंधाचें प्राकट्य होऊं शकलें आहे. अशा संबंधाची ही अखंड सांखळी आहे. पण कालाच्या ओघांत कांहीं दुवे लुप्त होतात व कांहीं प्रकट होत असतात. त्यामागेंहि कांहीं संकेत असला पाहिजे असें वाटतें. भगवान् शंकरानें कांहीं महाविद्या किलीत केल्या असें संदर्भ आपण वाचतो. कांहीं महाविद्या लुप्त झाल्या आहेत असें आपण म्हणतों, तर प्रसंगानें कांहींचें पुनः प्राकट्य झाल्याचें इतिहासांत आपणांस आढळतें. एकाद्या साधकाला आदेश होतो आणि तो एकादे रहस्य लिहून ठेवतोहि. मुद्रित संदर्भ उपलब्ध असूनहि गुरुकृपेनें दिव्यचक्षु मिळाल्याशिवाय तें रहस्य उकललें जात नाहीं. नाहीं तर षोडशी विद्येंतील १६ वें गुप्त अक्षर कोणतें हें शोधून काढण्याची विद्वानांची चाललेली धडपड ग्रंथांतून आपणांस पहावयास मिळाली नसती. एकाद्या युगांतील एकादें कार्य ठरल्या-बरोबर त्या विद्येचें किंवा त्या रहस्याचें प्राकट्य होत असतें आणि कार्य झाल्यावर सकृद्दर्शनीं तें रहस्य उकललें असून सुद्धां वस्तुस्थितीचा विचार केला तर तें लुप्त झालेलें दिसतें.

श्रीमद्दत्तात्रेयांच्या दिनचर्येंत ज्या ज्या स्थळांचा समावेश आहे त्यांचा अभ्यासहि उद्बोधक ठरेल.

काशीं स्नान करी । चंदन लावी पंढरपुरीं ।।
कोल्हापुरीं फिरे झोळी । भोजन करी पुरीं पांचाळीं ॥
तुळजापुरीं धुई हस्त । माहुरगडीं समाधिस्थ ।।

त्यांचें स्नान काशीक्षेत्रावर असतें, तर चंदन लावण्यासाठीं ते थेट पंढरपुराला येतात; कोल्हापुरीं भिक्षेसाठीं झोळी फिरवून भोजनासाठीं गोदातटाकाचें पांचालेश्वर त्यांनीं पसंत केलें आहे, तुळजापुरीं हस्तप्रक्षालन करून निद्रेसाठीं ते माहूरगडावर जातात असें या श्लोकावरून दिसतें. या क्षेत्रांपैकीं काशी, कोल्हापूर तुळजापूर व माहूर हीं शक्तिपीठें आहेत. पण पंढरपूर व पांचालेश्वराची पसंती त्यांनीं कां केली असावी ?

श्रीमद् आद्यशंकराचार्यांनीं पंढरपूरला महायोगपीठ म्हटलें आहे.

महायोगपीठे तटे भीमरथ्या
वरं पुण्डरीकाय दातुं मुनान्द्रैः ।
समागत्य तिष्ठन्तमानन्दकन्दं
परब्रह्मलिङ्गं भजे पाण्डुरङ्गम् ।।

[श्रीमच्छंकराचार्य, पाण्डुरङ्गाष्टक १

यावरून या स्थानाचें महत्व थोडेसें लक्षांत येतें; पण पद्मपुराणांतर्गत वाराहसंहितेंतील पांडुरंगमहात्म्यानें या स्थानावर चांगलाच प्रकाश टाकला आहे. शिवलीलामृताचे रचयिते श्रीधरस्वामी यांनीं सदर ग्रंथाधारें पांडुरंगमहात्म्याची मराठींत रचना करून मराठी वाचकांना या स्थानाची महती समजाऊन सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

यन्त्ररूपमिदं क्षेत्रं त्रिकोणं बिंदुरूपकम् । अष्टकोणं द्विदिक्कोणं मन्त्रस्थं नागकर्णिकम् ।।
षोडशारं त्रिवृत्तं च धरणीधराणिप्रभम् । ईशान्यभिमुखं चैतद्यंत्रक्षेत्रं धराधर ।।

[पद्मपुराण, पांडुरंगमाहात्म्य ६.९-१०

त्रिधा मूर्तिस्थलजलं भूत्वा देव प्रसीदसे ।
तदर्थे यन्त्ररूपं तु स्थूलं कृत्वा स्थितो हरिः ॥
बिंदुस्थानं समासाद्य पुण्डरीकान्तिकेऽथवा ।
तस्य श्रीविठ्ठलो नित्यं संतुष्टः स्यान्न संशयः ॥

[पद्मपुराण पांडुरंगमाहात्म्य ३२.१५ व ४१

आजचें पंढरपूर हें स्थान भैरवीचक्राधिष्ठित कसें आहे याचे तपशीलवार वर्णन त्याच ठिकाणीं पहावयास मिळतें. सारा ३२ वा अध्याय तर केवळ यंत्रस्थानालाच वाहून घेतलेला आहे.

या पुराणांतरीच्या संदर्भावर श्रीधरस्वामींनीं आणखी प्रकाश पाडला आहे. त्यांचे पूर्वज पंढरपूरजवळच नाझरे गांवचे राहणारे. खुद्द श्रीधरांचें वास्तव्य पंढरपुरांतच असे व त्यांनीं देह ठेवला तोहि त्याच क्षेत्रीं. हा साधारण इ. स. १६९० ते १७२९ च्या दरम्यानचा काळ होता. त्यावेळची पंढरपूर क्षेत्राची त्यांना चांगली माहिती असली पाहिजे. पण पद्मपुराणाधारें त्यांनीं पांडुरंग-माहात्म्य रचावयाला घेतलें असल्यानें मूळ ग्रंथांतील आशयाला प्राधान्य असणें साहजिकच होतें. पंढरीची ग्रंथांतरीं असलेली महती भाविकांना विशद करून सांगावी हाच त्यामागील उद्देश असावा. आज पंढरी म्हणताच वारकरी पंथ व त्यामुळें ज्ञानेश्वर, नामदेव, तुकारामादि संतकवींची पुण्यस्मृती आपल्या डोळ्यासमोर उभी राहते, त्याचा उल्लेख असावा तेवढा पांडुरंगमाहात्म्यांत नाहीं; पण विठ्ठलाचें ठायीं असलेला दृढभाव मात्र काव्यांत आढळतो. मराठेशाहीच्या उदयानंतर वारकरीपंथ वाढला असें प्रतिपादन करणारांना श्रीधरांचे वेळीं त्या पंथाचा प्रभाव तेवढा नसावा असें वाटतें.

वारकरीपंथाचा उदय केव्हां झाला आणि महाराष्ट्रांतील कानाकोपऱ्यांतूनहि त्याला आजचें वैभव केव्हां प्राप्त झालें हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. श्रीधरांना मूळ संस्कृताचें मराठीकरण करावयाचें होते तरीहि त्यांच्या वेळच्या परिस्थितीचा त्यांच्या काव्यांत उल्लेख आढळतोच.

करिती विठ्ठलनामाचा गजर । येती प्रेमळ भक्तांचे भार ।
ब्रह्मानंदें देव समग्र । धावती उत्साह पाहावया ॥
[श्रीधरकृत पांडुरंगमाहात्म्य १०.४९-५०

यावरून श्रीधरांचे वेळीं 'विठ्ठलनामाचा गजर' दुमदुमत होता. भक्तांचे थवेच्या थवे पंढरीला लोटत होते असें म्हणतां येईल. भक्तांना अशा रीतीनें आकर्षण करण्याचा स्थानाचा मूळ इतिहास सांगावा हीच कदाचित् त्यांची इच्छा असेल.

क्षेत्रमूर्ती आणि पुंडलीक । तीजे लक्ष्मीतीर्थ देख ।
हें यंत्र त्रिकोणात्मक । शोभिवंत तें ठाईं ॥
यंत्राचें मध्यस्थान । त्याचें नांव बिंदुतीर्थपूर्ण ।
तेथिंचें वर्णितां महिमान । अति अगाध असे हो ॥
[श्रीधरकृत पां. म. ३.१४-१५

शिव म्हणे उमे लागून । पूर्वीं यंत्र सांगितलें त्रिकोण ।
त्या मध्यभागीं बिंदुस्थान । तें मुख्य स्थळ हरीचें ॥ १ ॥
तें भूमी माजी अद्भुत । गुप्त आहे बिंदुतीर्थ ।
एक कोश पर्यंत । विवर विस्तार्ण असें ॥ २ ॥
[श्रीधरकृत पां. म. ४.१-२

तीन मूर्ती यंत्र त्रिकोण । मध्यें मुख्य बिंदुस्थान ।
भक्त जाणती सज्ञान । वरकडांस वश्य नसे तें । १२
[श्रीधरकृत पां. म. ६.१२

तंत्रशास्त्राच्या वरवर अभ्यासानें सुद्धां बिंदुत्रिकोणात्मक भैरवीचक्र हें आदिमायेचें प्रतीक कसें आहे या रहस्याकडे जातां येतें. तांत्रिक वाङ्मयांत शिवशक्तिच्या सामरस्याला बिंदु म्हणतात तर त्रिकोणाच्या तीन रेखा पश्यन्तीमध्यमावैखरीरूप तीन प्रकारचे शब्द आहेत; सृष्टिस्थितिसंहाररूप तीन प्रकारचे व्यापार आहेत; वामा ज्येष्ठा किंवा रौद्री क्रिया आहेत; ब्रह्माविष्णुरुद्ररूप तीन शिवांश अगर इच्छाहवनक्रियारूप तीन शक्त्यंश यांचे प्रतिनिधीरूप आहेत.

[तांत्रिक वाङ्मय शाक्तदृष्टि पृ. ७४-७५

अवघें क्षेत्र यंत्राकार । षोडशावरण सुंदर ।
दक्षिणद्वारका पंढरीनगर । तें वैकुंठ प्रत्यक्ष ।

[श्रीधरकृत पां. मा. ३.१९

पंढरपूर क्षेत्र हे केवळ यंत्राकार नाहीं तर त्यावरील आवरणेंहि षोडश आहेत हा उल्लेखहि आपणांला षोडशीकडेच नेतो. सज्ञान भक्तालाच तें गम्य आहे; वरकडाला तें वश्य नाहीं हें यामुळेंच.

श्रीधरस्वामींनीं स्वतःची गुरुपरंपरा सांगितली आहे. प्रत्यक्ष ब्रह्मदेवाकडून अत्रिऋषींना ज्ञान झालें असें सांगून,

त्याचे पोटीं पूर्णावतार । झाला दत्तात्रेय दिगंबर ।
अत्रीनें ज्ञान समग्र । दत्तात्रेयासि दीधलें ॥
दत्तात्रेयें तें ज्ञान । दीधलें सदानंदा लागुन ।
तेंचि रामानंदीं पूर्ण । निजज्ञान बिंबलें ॥

[श्रीधरकृत पां. मा. १०.६१-६२

व अशा गुरूपरंपरेतून आलेले पूर्णानंद ' तोचि स्वामी माझा पै ' असें श्रीधर म्हणतात. त्यामुळें जो आनंदसंप्रदाय तयार झाला त्यापैकीं श्रीधरस्वामी असल्यानें पंढरपूर हें शक्तिस्थान आहे हें लक्षांत येतांच त्या पूर्वपीठिकेचा प्रभाव त्यांच्यावर पडला असणें साहजिक आहे.

पांडुरंगाच्या नामसंकीर्तनांत दंग झालेल्या वारकऱ्यांच्या भक्तिमार्गात देखील मूळ शक्तिपीठांतील एका महत्वाच्या प्रतीकालाहि स्थान आहे. वारकरीसंप्रदायांत नामसप्ताह सुरूं करण्यापूर्वीं एकाद्या उच्चासनावर धान्याची रास मांडून श्रीफलयुक्त कलश (पूर्णकुंभ) ठेवण्याची पद्धत आहे. त्याशिवाय ज्ञानेश्वरी, तुकारामांची गाथा आदि ग्रंथ किंवा वारकऱ्याचा ध्वज तेथें प्राधान्येंकरून असतो हेहिं खरेंच. हा पूर्णकुंभ श्रीविद्येचें किंवा भैरवीचक्राचें प्रतीक आहे हें

पूर्णेन्दौ पूर्णकुम्भे वा ध्यात्वा नारायणीं पराम् ।

या सारख्या तंत्रशास्त्रांतील आढळणाऱ्या संदर्भावरून पटण्यासारखें आहे.

पंढरपूर क्षेत्र हें भैरवीचक्राधिष्ठित आहे हें एकदां लक्षांत आल्यावर या स्थळाचा आदिमायेशीं व पर्यायानें श्रीविद्येशीं निकटचा संबंध येणारच. त्यामुळेंच दत्तात्रे-यांच्या दिनचर्येंत हें स्थान कां आलें याचा उलगडा होऊं शकतो.

पांचालेश्वर तर दत्तात्रेयांची तपोभूमि आहे. तेथें त्यांना विज्ञानेश्वरानें दर्शन दिलें. कलियुगांतील तीन आराध्य देवता दत्तात्रेय, गणपति व दुर्गा यांतील त्रिकांचें साम्य लक्षांत घेतां पांचालेश्वराची निवड लक्षांत येऊं शकते. महानुभावपंथाचेंहि तें यात्रास्थान झालेलें आहे.

दत्तात्रेयांचा महानुभावपंथाशीं अत्यंत निकटचा संबंध आहे. 'या मार्गासि श्रीदत्तात्रेयप्रभु आदिकारण' असें खुद्द श्रीचक्रधरस्वामीच म्हणतात. (सूत्रपाठ विचार २५) श्रीदत्तात्रेय हे महानुभाव पंथाचे मूळप्रवर्तक मानले जातात याचें कारण श्रीचक्रधरादि अवतारांवर त्यांनीं ज्ञानशक्तीचा अनुग्रह केला हेच आहे. चांगदेव राऊळ हे संसारत्याग करून माहूर येथें गेले वेळीं दत्तात्रेयांनीं त्यांना व्याघ्ररूपानें भेटून शक्तिदान केल्याचे संदर्भ आपणांस पहावयास मिळतात.

मात्र श्रीपादश्रीवल्लभ किंवा श्रीनृसिंहसरस्वती यांच्या कार्यामुळें महाराष्ट्रांत विख्यात पावलेला दत्तसंप्रदाय, महानुभावांच्या दत्तसंप्रदायाहून वेगळा आहे अशी एक विचारसरणी आढळते. महाराष्ट्रांत त्रिगुणात्मक त्रैमूर्ति दत्तात्रेय प्रचलित आहे. ब्रह्माविष्णुमहेशांच्या एकीकरणांतून प्रगट झालेला अवतार महानुभावपंथीयांना मान्य नसावा. दत्तात्रेयांना ते प्रत्यक्ष परब्रह्माचा अवतार मानतात. कांहीं महानुभाव एकमुखी पण सहा हातांच्या दत्ताची उपासना करतात. ती अपवादा-त्मक असली तरी तेथें सहा हात व एक मुख हें लक्षांत घेण्यासारखें आहे. महा-राष्ट्रांसहि त्रिमुखी दत्ताप्रमाणें एकमुखी दत्तहि उपास्य दैवत आहेच. श्रीवासुदेवानंद-सरस्वतींचा दत्तात्रेय एकमुखीच होता. दत्तात्रेयांचें अवधूत अवस्थेतील सर्व परिचित दर्शनहि एकमुखीच आहे.

डॉक्टर कोलते यांनी श्रमपूर्वक संपादित केलेल्या रवळोबास यांच्या 'सह्याद्रिवर्णन' काव्यांत दत्तात्रेयांचें जन्मरहस्य मोठ्या मार्मिक रीतीनें वर्णन केलें आहे. त्यांचे दृष्टीनें श्रीदत्तात्रेय शुद्ध चैतन्याची शोभा किंवा ज्ञानभक्तीचें आद्यस्वरूप आहेत.

या परब्रह्माच्या अवताराचें वर्णन आपणाला, ज्या महान् कार्याचें आज आपणं विवेचन करीत आहोंत त्याला पुष्टिकारकच ठरतें. नमनाचा भाग संपतांच मूर्तिवर्णनाला सुरवात करतांना रवळोबास त्यास 'श्रीमूर्तिवर्णन' असें नांव देतात, आणि हें अवतरण कसें झालें हें सांगतांना

कि सर्वागमाचार्यें अत्रिपत्रीं । ब्रम्हविद्या-मंत्र-बीज-पवित्रीं ।
उद्धारीलें शांभवएंत्रीं: जीवां सीध्द पुज्य ॥

[सह्याद्रिवर्णन २६

सर्वागमाचार्य हे परमशिव होत, त्यांनीं अत्रिरुपी पानावर शांभवरुपी यंत्र काढून त्यांत ब्रह्मविद्येच्या मंत्राचें पवित्र बीज घालून हें यंत्र - म्हणजे हा परमेश्वरी अवतार प्रगट केला. आणि त्यांतील हेतू देखील सकल जीवांना सिद्धि प्राप्त करून देणें हाच. या ओंवींतील सर्वागमाचार्य, ब्रह्मविद्या-मंत्र-बीज, शांभवयंत्र हे शब्द महत्वाचे आहेत. पुढील दोन्ही ओव्याहि तितक्याच चिंतनीय आहेत.

कीं मायाशक्ति-हवनकुंडीं । कृपामंत्राहुतीचीया प्रौढी ।
चिदानंदमूर्ति प्रकटली चोखडी । वरद स्थावरजंगमा ॥

[सह्याद्रिवर्णन २७

दत्तात्रेय हे चिदानंदमूर्ति आहेत, मायाशक्तिरूपी हवनकुंडांत जेव्हां मंत्राहुतीची कृपा झाली तेव्हां त्यांतून या चिदानंदस्वरूप दत्तात्रेयांचें प्राकट्य झाले, आणि उद्देशहि स्थावरजंगमांना आशीर्वचन देणें हाच. आदिमायेचें प्राकट्य हवनकुंडांतील तेजोवलयांतून झालेले संदर्भ आपण जाणतोच. तीच मायाशक्ति दत्तात्रेयांचें रूपानें प्रकट झाली हा या ओवीचा भावार्थ.

ते श्रीमूर्ति चापेगौर । कवणा वर्णवे सूंदर !
जिएचें नांवचि उदार। ते सगुण बोलों कैसी ॥

[सह्याद्रिवर्णन २८

दत्तात्रेय श्रीमूर्ति आहेत 'श्री'चें आदिमायेचें प्रत्यक्ष स्वरूप आहेत, आणि याचें

कारणहि ब्रम्हविद्येच्या पवित्र मंत्राचें बीज तेथें आहे. अर्थात् त्यांचे केवळ नामसंकीर्तनच जीवांचा उद्धार करतें.

चैतन्यादि विद्या निराकारीं । रूपेंविण प्रवासु झाला भारीं ।
म्हणौनि नाभिका दोंदें गंभिरीं । थार केली ।।

[सह्याद्रिवर्णन ९३

चैतन्यस्वरूपी निराकार आदिविद्येला दत्तात्रेयांच्या अवतारांत त्यांच्या गंभीर नाभीवर स्थिर व्हावेसें वाटलें,

याहि ओवींत तीच कल्पना निराळ्या रीतीनें रवळोबास यांनीं मांडली आहे हें आपल्या लक्षांत येईल.

म्हणौनि अवतारां आणिकां । तो अवतारू नव्हे सारिखा ।
ते सज्ञान वीचारतु कां । विवेकदृष्टी ।।

[सह्याद्रिवर्णन १४१

ज्ञानी लोकांनीं विवेकानें विचार केला तर दत्तात्रेयांचा अवतार हा कांहीं निराळा आहे हें लक्षांत येईल हेंच या ओवींत रवळोबास सुचवितात.

महानुभाव हा विशुद्ध दत्तसंप्रदाय नव्हे कारण त्यांत पंचकृष्णांना प्राधान्य आहे. पंथाचें आदिकारण श्रीदत्तात्रेय अत्रिअनसूयेच्या उदरीं जन्मा आले असले तरी त्याला ब्रह्मा-विष्णु-महेश यांचा सगुणरूपांतील एकत्रित अवतार मानण्याऐवजीं मूलशक्तीचें प्राकट्य ते मानतात. महाराष्ट्रांतील दत्तसंप्रदाय जी मूलशक्ति सृष्टि-स्थिति-लय या रूपानें त्रिविधा झाली होती तिचें दत्तात्रेयांचें ठायीं एकीकरण मानतो. हाच दोहोंतहि तात्विक फरक. ब्रह्मा-विष्णु-महेशांच्या उपासनेचें ऐक्य गुरुचरित्रांतील संप्रदायांत आपणांस आढळतें. तसेंच परब्रह्माचा अवतार म्हणून जरी दत्तात्रेयांना महानुभाव मानीत असला तरी दत्तात्रेय व श्रीकृष्ण यांचें मीलन त्याला मान्य आहे म्हणजे पर्यायानें महाविष्णूच्या श्रीकृष्णरुपी उपासनेचें मीलन तो मानतोच. सर्वागमाचार्यांनीं ब्रह्मविद्या-मंत्र-बीजानें केलेला शांभवयंत्राचा उद्धार म्हणजेच दत्तात्रेयांचें अवतरण हें प्रतिपादन आपणांला त्रिपुरारहस्यांतील श्रीविद्येशीं

असलेल्या परमशिव व दत्तात्रेयांच्या संबंधाकडे नेतें आणि आजचा आपला विषय अगदीं तोच आहे.

दत्तभगवान् व नाथसंप्रदाय यांचा संबंध रहस्यमय आहे. श्रीनरसिंहसरस्वती श्रीशैलावर गेले हें आपण जाणतांच आणि नाथसंप्रदायाची उदयभूमि श्रीशैलच आहे हें पाहण्यासारखें आहे. नाथसंप्रदायाच्या देवतासमूहांत दत्तात्रेयांना मोठें स्थान आहे. गोरक्षनाथांच्या भारतांतील मंदिरांतून गोरक्षनाथांच्या मूर्तिबरोबर मत्स्येंद्रनाथ व दत्तात्रेय यांच्याहि मूर्ति आढळतात. नाथपंथीय योग्यांचा अवधूत हा आदर्श आहे. गोरक्षसिद्धांतसंग्रहामध्यें अवधूतांचें लक्षण खालील श्लोकांत पहावयास मिळते.

एकहस्ते धृतस्त्यागो भोगश्चैककरे स्वयम् ।
अलिप्तस्त्यागभोगाभ्यां सोऽवधूतः श्रियेऽस्तु नः ॥
क्वचित् भोगी क्वचित्त्यागी क्वचिद्भग्नः पिशाचवत् ।
क्वचिद्राजा क्वचाचारी सोऽवधूतो विधीयते ॥

[गोरक्षसिद्धांतसंग्रह पृष्ठें १ व १०

नवनाथभक्तिसारांत मत्स्येंद्रगोरक्षांचा दत्तात्रेयांशीं असलेला संबंध सर्वांना परिचित आहे. अवधूतगीता हा ग्रंथ दत्तात्रेयांनीं गोरक्षनाथांना बोधिल्याची कथा आहे. दत्तगोरक्षगोष्टी असा एक नाथसंप्रदायिक ग्रंथ उपलब्ध आहे. देवनाथ व दयाळनाथ या नाथपंथीयांची परंपरा दत्तप्रणीतच आहे. मीनानाथास तर दत्तात्रेयांनीं दीक्षा दिल्याचा उल्लेख गंधर्वतंत्रांत आढळतो. दत्तात्रेयांना निरंतर पारधीचें व्यसन आहे अशी त्यांची श्रद्धा आहे.

श्रीविद्येची प्राप्ती होण्याकरितां लक्ष्यावर पारध्याप्रमाणें ध्यान केंद्रित करून साधक जोंपर्यंत उपासना करणार नाहीं, तोंपर्यंत त्याला त्याचें लक्ष्य प्राप्त होणार नाहीं हें जणू कांहीं पटवून देण्यासाठींच दत्तात्रेयांनीं पारध्याचे स्वरूप धारण केलेलें आहे असें वाटतें. पारध्याचें लक्ष मृगावर असते, आणि श्रीविद्या ही हरिणीरूपधरा आहे असा संदर्भ आपणास श्रीसूक्तटीकेंत मिळतो. दुसऱ्या एका अर्थानेंहि दत्तात्रेय हे पारध्याप्रमाणें सच्छिष्याला हुडकण्यांत अखंड गुंतलेले

आहेत असें म्हणतां येईल. असें जर नसेल तर कल्पना नसतांना दत्त म्हणून समोर उभें राहून दत्तात्रेयांनीं दर्शन दिलेल्याची उदाहरणें घडलीं नसतीं.

अथ तत्रैकवीरायाः कृष्णशक्तेर्मनुं शृणु ।
या तु भार्गवरामेण कार्तवीर्यवधाय च ।
कृत्वा स्वं शाबरं रूपं वाममार्गेण सेविता ।

[मेरुतंत्र ३०. ११५

' कृत्वा स्वं शाबरं रूपं ' यांतहि शाबर आणि शाबरी विद्या यांचा मेरुतंत्रांतील उल्लेख तेंच दर्शवितो

अवधूतगीता किंवा जीवन्मुक्तगीता या दोहींचा भर ज्ञान आणि योग मार्गावर दिसत आहे पण परशुरामांचा दत्तात्रेयांच्या बरोबर झालेल्या संवादावरून असें दिसतें कीं, या प्रसंगानें महात्रिपुरसुंदरी किंवा आदिमाया हिच्या उपासनेची महति दत्तात्रेयांना जगताला सांगावयाची आहे. ' त्रिपुरोपास्तिपद्धति ' हें ग्रंथाचें नांवच तसा आशय सुचवितें. परशुरामांना ज्ञानप्राप्ती झाल्यावर, सर्वसाधारण साधकाची मनाची झेप तेथवर पोहोंचणार नाहीं हें वाटल्यावरूनच कीं काय परशुरामांनीं कल्पसूत्राची रचना केली. सुरवातीस मी म्हटल्याप्रमाणें आदिमायेच्या प्राप्तीसाठीं, तिच्याशीं ऐक्य मिळविण्यासाठीं ज्ञान, योग व भक्ति या तीनहि मार्गांची शिकवण दत्तात्रेयांनीं दिलेली दिसते. पण गुरु प्रसन्न झाल्यावर साधकाच्या त्वरित प्रगतीसाठीं कांहीं दीक्षापद्धति अवलंबिलेली आहे असें दिसतें.

दीक्षां प्रगृह्य गुरुपद्धत्या उपासनेन नरो मोक्षं प्राप्नोति ।

[त्रिपुरारहस्य, प्रस्तावना पृ. ४८

गुरूपदिष्ट मार्गानें उपासनापद्धतीच्या द्वारें जेव्हां साधकाची प्रगति व्हावयाची असते तेव्हां साधकाच्या दर्जाप्रमाणें गुरु दीक्षाविधीनें त्याला पायरी पायरीनें उपदिष्ट करतात.

दीक्षावन्तोऽबुधा अपि सद्गतिं लभन्ते ।

[त्रिपुरारहस्य, प्रस्तावना पृ.४८

कोणत्या क्रमानें ही उपासना केली असतां त्वरित फल प्राप्त होतें असाहि एक प्रश्न परशुराम दत्तात्रेयांना विचारतात आणि त्यावेळीं

शिवो यथाभिषेकेन प्रणामैर्दिनकृद्यथा ।
नैवेद्यैस्तु गणेशानोऽलंकाराद्धरिरेव च ॥
पूजनेन विशेषैस्तु विधिना प्रीयते तथा ।
पराशक्तिर्महेशानी तत्र सर्वोत्तमं शृणु ॥

[त्रिपुरारहस्य ८०. ६-७

निरनिराळ्या देवतांना कोणत्या कोणत्या प्रकारची उपासना आवडते, पूजाविधीनें महात्रिपुरसुंदरी ही कशी संतुष्ट होते तें सांगून तपशीलवार पूजा कशी करावी हें दत्तात्रेयानीं येथें सांगितलें आहे.

एक उत्कृष्ट देव्हारा उभा करून त्यांत श्रीचक्रराजाची किंवा महातपस्वीमुनींची सुलक्षण मूर्ति विधियुक्त स्थापन करावी. रोज पंचकाल तिची पूजा करावी, महा-पर्वणीच्या वेळीं तिचा उत्सव करावा आणि रथांतून मिरवणूक काढावी. कारण

एवं यः कुरुते लोके स वसेच्छ्रीपुरान्तरे ॥

[त्रिपुरारहस्य ८०. १२

अशा साधकाला श्रीपुरवासाचें भाग्य लाभतें.

श्रीसूक्तेनाभिषेकं वै कुर्याच्छ्रीचक्रनायके ।

[त्रिपुरारहस्य ८०. ६४

श्रीचक्राराधनेला श्रीसूक्तावर्तनाचा उपयोग करावा असाच याचा स्पष्ट अर्थ आहे ' श्रीसूक्तैः शांतिपाठैः ' शांतमहामुनींनीं श्रीविद्येची आराधना केली हा स्कंदपुराणाच्या सह्याद्रिखंडांतील संदर्भहि तेंच दर्शवितो.

यावरुन एक गोष्ट लक्षांत येईल कीं, खुद्द दत्तात्रेयांनीं महात्रिपुरसुंदरीच्या उपासनापद्धतींत श्रीसूक्ताच्या अभिषेकास एक विशिष्ट स्थान दिलें आहे; आणि असें आश्वासन दिलें आहे कीं,

स देहान्ते श्रीपुरे तु स्थानं प्राप्नोति तादृशम्

[त्रिपुरारहस्य ८०. ७७

दानाचा उल्लेख करतांना श्रीचक्रदान हें महाफलदायक आहे असें सांगितलें आहे. त्याचें पुण्यवर्णन करतांना

एवं दद्याद्यस्तु दानं चक्रराजस्य भक्तितः ।
तस्य प्रीता महादेवी स्वसायुज्यं प्रयच्छति ॥
सर्वतीर्थेषु स स्नातस्तेन सर्वं व्रतं कृतम् ।
सर्वं दानं तेन दत्तं तेन यज्ञास्तथा कृताः ॥

[त्रिपुरारहस्य ८०. ८८-८९

या श्रीचक्रदानानें श्रीदेवी साधकाला स्वसायुज्याप्रत नेतें. सर्व तीर्थांत स्नान केल्याचें पुण्य त्याला लाभतें. यज्ञदानाचें श्रेय त्याला प्राप्त होतें हाच याचा भावार्थ. पण महापूजाविधि किंवा उपासनाविधि सांगितला तरी

भुवं विना यथा बीजं नाङ्कुरं प्रतिरोहयेत् ।
तथा भक्तिं विना ज्ञानं फलं न जनयेत् क्वचित् ।

[त्रिपुरारहस्य ८०.११६

थोडक्यांत श्रद्धा व भक्तियुक्त उपासना केल्यावर ज्ञानप्राप्ति होईल हाच दिलासा त्रिपुरारहस्यांत दिला आहे.

श्रीविद्या पूजनप्रिय आहे आणि श्रीसूक्तानें अभिषेक केल्यावर ती प्रसन्न होते हें आपण पाहिले. देवीच्या प्रसन्नतेसाठीं सप्तशतीचा पाठ तर सर्वत्र प्रचलित आहेच. गुरुचरित्राच्या पाठामुळें आकाशांत उमटणाऱ्या लहरी आणि सप्तशतीपाठाच्या लहरी या एकच आहेत असें ध्वनिशास्त्रज्ञांचें प्रामाणिक मत आहे. अत्यंत सूक्ष्म रीतीनें सुद्धां या दोन्ही परंपरांचा कसा घनिष्ठ संबंध आहे हें आपण पाहिलेंच.

विष्णुयामलतंत्रांतील भार्गवकवच हें या स्थानावरून प्रसिद्ध झालें आहे. भार्गव-कवच ही तंत्रोक्त-श्रीविद्या आहे. जागोजाग श्रीविद्येचे उल्लेख त्यात विखुरलेले

आहेत. पण आकलनासाठीं दृष्टीची गरज आहे. "श्रीकामस्तुमहेंद्राद्रेर्द्रोणिं गत्वा मनोहराम्" या श्लोकांत जो श्रीकाम आहे, ज्याला श्रीविद्येची प्राप्ती व्हावी अशी तळमळ आहे त्यानें कोणत्या स्थळीं जावें, कशी आराधना करावी म्हणजे इच्छित फलश्रुति मिळेल याचें स्पष्ट शद्बांत अभिवचन आहे. आपणां सर्वांच्या लक्षांत एक गोष्ट येईल कीं, साधकाची परीक्षा घ्यावयाची असली तर ती अत्यंत खडतर असू शकते आणि जर सद्गुरूंनां कृपा करावयाची असेल तर न मागतां देखील ते प्रचंड भांडार तुमच्या हातांत आणून देत असतात. फक्त तळमळ व श्रद्धा आपणांजवळ हवी. त्यांचा वरदहस्त नेहमींच पुढें असतो.

श्रीमद् दत्तात्रेयांच्या अवतारांतील एका महत्वाच्या अंगाचें मी थोडक्यांत विवेचन करण्याचा प्रयत्न केला. इहसुखाची तळमळ घेऊन त्यांचेकडे जाणारा समाधानी तर होतोच पण परागतीची उत्कंठा असणाऱ्याला ते कशा रीतीनें तावून सुलाखून हाताशीं धरतात हेहि आपण पाहिलें.

गुरुकृपेनें श्रीविद्येची प्राप्ती व्हावी अशी ओढ कांहींना लागणें शक्य आहे. गुरुकृपेनें भाग्य लाभत नाहीं तोंवर काय करावें असाहि विचार कांहींच्या मनांत येणार आहे. यामागील निश्चित संकेत असा दिसतोय कीं, षोडशीची प्राप्ती होण्यासाठीं पूर्व तयारी व्हावयाला हवीच, तरच तें भाग्य लाभत असावें. गतजन्मींची तयारी असेल तर या जन्मीं सद्गुरु तुम्हांस आपण होऊन पाचारण करतील. पण हें जोंपर्यंत आपणांस माहीत नाहीं तोंपर्यंत या जन्मीं योग्य मार्गानें साधना करीत राहणें साधकाचें कर्तव्य आहे.

'राज्यं देयात् शिरो देयात् न देयात् षोडशाक्षरी' हा दंडक विचारांत घेतां असें वाटूं लागतें कीं, मार्ग तरी कसा समजणार ? श्रीविद्येच्या द्वादश उपासकांनीं कोणत्या साधनेनें ती प्राप्त करून घेतली हें आपणांला ग्रंथांतरीं आढळत नसलें तरी पंचदशीच्या रूपानें त्या विद्येचें असलेलें प्रकट रूप आपणाला सांगण्यांत आलें आहे.

'गायत्री' देखील त्या साधनेचें स्थूलरूप आहे.

तस्या रूपद्वितयं तत्रैकं यत्पठ्यतेऽस्पष्टम् ।
वेदेषु चतुर्ष्वपि परमत्यन्तं गोपनीयतरम् ॥
[वरिवस्यारहस्य ७

या आणि अशा प्रकारच्या साधना इतस्ततः पेरून ठेवण्यांत आल्या आहेत. श्रीस्वामीसमर्थांनीं सामान्य जनाकरितां प्रवर्तित केलेली पंचदशी उपासना देखील रहस्यमय आहे.

श्रीस्वामीसमर्थ जय जय स्वामीसमर्थ

लोपामुद्रादि श्रीविद्योपासकांची म्हणून बीजमन्त्ररूप श्रीविद्योपासना ग्रंथांतरीं आढळते. तिचें मनन जिज्ञासूला उपयोगी पडणारें आहे.

१) हसकलह्रीं हसकहलह्रीं सकलह्रीं इति लोपामुद्रोपासिता श्रीविद्या ।
२) कहएईलह्रीं हकएईलह्रीं सकएईलह्रीं इति मनूपासिता श्रीविद्या ।
३) सहकएईलह्रीं सहकहएईलह्रीं हसकएईलह्रीं इति चन्द्रोपासिता श्रीविद्या।
४) हसकएईलह्रीं हसकहएईलह्रीं हसकएईलह्रीं इति कुबेरोपासिता श्रीविद्या ।
५) कएईलह्रीं हसकहलह्रीं सहसकलह्रीं इत्यगस्त्योपासिता श्रीविद्या ।
६) कएईलह्रीं हसकहलह्रीं सहसकलह्रीं इयं द्वितीया लोपामुद्रोपासिता श्रीविद्या ।
७) सएईलह्रीं सहकहलह्रीं सकलह्रीं इति नन्द्युपासिता श्रीविद्या ।
८) कएईलह्रीं हसकहलह्रीं सकलह्रीं इतीन्द्रोपासिता श्रीविद्या ।
९) कएईलह्रीं सहकलह्रीं सहसकलह्रीं इति सूर्योपासिता श्रीविद्या ।
१०) कएईलह्रीं हसकहलह्रीं सहसकलह्रीं कएईलहसकहलसहसकलह्रीं इति शिवोपासिता श्रीविद्या ।
११) कएईलह्रीं हसकहलह्रीं सहसकलह्रीं सएईलह्रीं सहकहलह्रीं सकलह्रीं इति षट्कूटा विष्णूपासिता श्रीविद्या ।
१२) कएईलह्रींह्रीं हसकहलह्रींह्रीं सकलह्रींह्रीं इति दुर्वाससोपासिता श्रीविद्या।

[श्रीविद्यार्णवतंत्र पृष्ठें १४१–१४२

कदाचित् या पंचदशीच्या उपासनेनेंच गुरुकृपा होणार असेल व आपणांला १६ वें अक्षर लाभणार असेल. हें सोळावें गुप्त अक्षर कोणतें असावें यावर विद्वानांचीं भाष्यें वाचावयाला मिळतात. पण गुरुकृपेनेंच जर तें लाभणार असेल तर पांडित्याच्या कसरतीचा अभ्यास करण्यांत वेळ खर्च करणें इष्ट कीं समजलेली

पंचदशीची साधना करण्यांत तो वेळ घालविणें इष्ट हें ज्याचे त्यानें ठरवावयाचें आहे. पांडित्याची कसरत हा शब्दप्रयोग कांहीं गैरसमज करेल म्हणून मला खुलासा करावासा वाटतो. सोळावें अक्षर कोणतें असावें यासाठीं सूक्ष्म धागेदोरे जुळवून अक्षराचा अंदाज करणें त्या व्यक्तीच्या संशोधक वृत्तीची साक्ष असली तरी तें १६ वें अक्षर अमुकच हें त्या संशोधकाला सांगतां येणार नाहीं. सांगितलें तरी त्यांचा साधकाला फायदा होणार नाहीं. 'गुरुमुखादेवावगन्तव्यम्' अशी ती विद्या आहे. गुप्तरीतीनें विखरून ठेवलेले धागेदोरे विद्याप्राप्तीनंतर भाग्यवंताचें समाधान द्विगुणित करण्यासाठींच आहेत.

गुरुमुखांतून प्राप्त होत असली तरी अशी ही श्रीविद्या ज्या परंपरेनें भूतलावर प्रसृत झाली त्यांत श्रीमद् दत्तात्रेयांना अग्रस्थान आहे.

तद्रहस्यं महापुण्यं शिववक्त्रैकगोचरम् ।
आदिनाथाच्छक्तिमुखात्सदाशिवतुरीयकात् ।।
रुद्राद्विष्णोर्मया लब्धं नान्यो जानाति कश्चन ।
मर्त्ये लोके महाविष्णोरंशो दत्तगुरुः स्मृतः ।।
तेन श्रीकण्ठमुखतः श्रुतं स्वांशे समाक्षिपत् ।
भार्गवः सोऽपि गुर्वाज्ञावशेन प्रोक्तवान् ततः ।।
सुमेधसे स्वशिष्याय स संप्रति महीतले ।
चिकीर्षुर्ग्रन्थरूपेण हालास्यं समुपस्थितः ।।
त्रिपुराध्याननिरतः श्रीगुरोराज्ञया बुधः ।
इत्युक्तं देवदेवेन ब्रह्मणा ब्राह्मणं प्रति ।।
तत्त्वां द्रष्टुमिह प्राप्तः सत्यमेतद्ब्रवीमि ते ।

[त्रिपुरारहस्य २. ३४–३९

हा संदर्भ, श्रीविद्येची भूतलावर साधना सुरुं होतांच त्याबद्दलची कुतूहलात्मक प्रतिक्रिया देवलोकीं कशी झाली हेंच दर्शवितो. परशुरामांच्याकडून सुमेध हरितायनांना या विद्येचें ज्ञान झालें व साधनेसाठीं सुमेध श्रीशैल्यावर गेले तेव्हां

देवलोकीं याबद्दल कुतूहल निर्माण होऊन प्रत्यक्ष नारदांना त्यांच्या भेटीसाठीं भूतलावर यावेसें वाटलें, एवढें महत्त्व या विद्येच्या प्राप्तीला आहे. मी आतांच म्हटल्याप्रमाणें गुरुकृपेची तळमळ वाढविणें एवढेंच याबाबत साधकाच्या हातांत आहे.

आतांपर्यंतच्या विवेचनावरून अवधूत दत्तात्रेयांचें श्रीविद्येच्या उपदेशकांत सर्व-श्रेष्ठ स्थान कसें आहे हें आपण पाहिलें. दत्तात्रेयांचा अवतारच मुळीं या कार्यासाठीं आहे. महाकवि माघ म्हणतात कीं, गुरुपरंपरेचा विच्छेद झाल्या-नंतर श्रुति लुप्त होत गेल्या. अशा वेळीं वैदिक धर्माचें रक्षण व्हावें म्हणून अत्रिअनसूयेच्या उदरीं जन्म घेऊन भगवान् दत्तात्रेयांनीं स्वतःच्या अप्रतिहत स्मरणशक्तिद्वारा सर्व लुप्त श्रुतींचा उद्धार केला.

[ज्ञानदीपबोध पृ. १५-१६

इतकेंच काय, ही गुरुपरंपरा अखंड चालू ठेवण्याचें महान् कार्य युगायुगांतून चाललेलें दिसून येत आहे. दत्तात्रेयांना आदिगुरु मानणाऱ्या संप्रदायाचा अभ्यास करतांना आपण पाहिलें कीं, ही गुरुशिष्यपरंपरा तेंच कार्य कसें चालू ठेवीत आहे ! या निमित्तानें कदाचित् श्रीस्वामीसमर्थांनीं पसंत केलेल्या अक्कलकोट येथील या स्थानावर तेंच कार्य कसें चालू आहे हें समजून घेणें उद्‌बोधक होईल.

'बाळप्पामहाराजांचा मठ' म्हणून हें स्थान बराच काळ ओळखलें जात आहे. पण परमसद्‌गुरु श्रीगजाननमहाराजांनीं 'गुरुमंदिर' म्हणून या स्थानाची महती तुम्हाआम्हांवर बिंबविण्याला सुरवात केली. सुरवातीला या बदलाचें तितकेंसें महत्त्व लक्षांत आलें नाहीं. पण आज तें पटूं लागतें. श्रीसमर्थांनीं निरनिराळ्या मार्गांनीं शिष्यांना जवळ बोलाविलें होतें असेंच श्रीबाळप्पांच्या बाबत दिसतें. आणि ज्या वेळीं मनाची उत्कंठा वाढून ते अक्कलकोटला आले, तेव्हां श्रीस्वामी-महाराजांची स्वारी खासबागेंत होती. रिक्तहस्तें दर्शनास जावयाचें नसतें म्हणून श्रीबाळप्पांनीं एक पैशाची खडीसाखर घेतली व ते तडक खासबागेंत निघाले. स्वप्नांत दिलेलें दर्शन प्रत्यक्षांत पाहतांच श्रीबाळप्पांचा आनंद त्रिभुवनांत मावेनासा झाला. वासरु गायीकडे धावतें तसें धावत जाऊन श्रीबाळप्पांनीं श्रीस्वामीसमर्थांचे चरण धरले. श्रीनांहि परम भक्त भेटल्यानें झालेला आनंद, या झाडाला अलिंगन

दे, त्या झाडाला मिठी मार अशा कृतींनीं त्यांनीं व्यक्त केला. ही घटना श्रीसमर्थांचा व श्रीबाळप्पांचा पूर्वनियोजित संबंधच दर्शविते.

जगदुद्धारासाठीं । स्वामी स्वामिदास भेटी ।

हाच त्यामागील संकेत असला पाहिजे, सुंदराबाईशीं झालेल्या बोलाचालीमुळें विषण्ण मनानें श्रीबाळप्पा विचार करूं लागतांच श्रीस्वामीसमर्थ म्हणतात :

' कसा नांदतोस, कसा नांदतोस,

गुरु हो, गुरु हो, गुरु हो म्हणतो. '

अर्थात् ' गुरु हो ' ही आज्ञा देण्यांत अनाद्यविच्छिन्न गुरुपरंपरा प्रदर्शित करणें हाच श्रीस्वामीसमर्थांचा उद्देश असला पाहिजे. त्याच हेतूनें श्रीबाळप्पांची निवड झाली असली पाहिजे किंवा त्यांचें अवतरण याच कर्महेतुस्तव झालें असलें पाहिजे.

' खाली कोण येत आहे त्याला आसन दाखीव. '

' तो कुलदीपक आहे. '

' तुझे कांबळे कशास घेईल. त्यास शालजोडी मिळेल. '

' माझें शिक्कामोर्तब तुला देत आहे, माझा शिक्का यावच्चंद्रदिवाकरौ चालव. '

हीं किंवा अशा प्रकारचीं श्रीसमर्थांनीं उच्चारलेलीं वाक्यें श्रीबाळप्पांची योग्यता व त्यांचेकडून अपेक्षित असलेलें कार्य दर्शवितात.

महाप्रयाणापूर्वी श्रीबाळप्पांना जवळ बसवून आपले कंठांतील रुद्राक्ष त्यांचे गळ्यांत बांधणें, अंगावर छाटी घालणें, हातांत प्रसादपूर्ण पादुका व निशाण देणें व मस्तकावर वरदहस्त ठेवणें ह्या सर्व कृति गुरुपरंपरा चालविणेंसाठीं मठस्थापना करावी हीच स्वामीसमर्थांची असलेली इच्छा दर्शवितात. हें कार्य आपल्या हातुन कसें पार पडणार याची चिंता श्रीबाळप्पांना लागली असतां श्रीस्वामीसमर्थांनीं स्वप्नांत येऊन त्यांना आदेश दिलाः

' मी शरीरानें अन्तर्धान पावलों असलों तरी तुझ्या द्वारां मीच कार्य करणार आहे, तूं केवळ निमित्त मात्र आहेस; पादुकांचे द्वारा माझी द्वाही फिरवून लोकसंग्रह कर, '

सद्‌गुरूंचे आज्ञेप्रमाणें श्रीबाळप्पांनीं मठस्थापना करावयाचें ठरविलें. त्यासाठीं आजूबाजूस घरें असलेली अशी एक मध्यवर्ती सरकारी जागा त्यांनीं मागितली. ही जागेची निवडहि मोठी विचार करण्यासारखी आहे. आजूबाजूस घरें असतांना मधलीच जागा कांहीं विशेष सोय होती म्हणून निवड केली असावी असें वाटत नाहीं. उलट त्या स्थानाचें रहस्यपूर्ण महत्त्व त्यांना ज्ञात झालें असलें पाहिजें असेंच म्हणावें लागेल. पूर्वज्ञानानेंच ती जागा त्यांना दृग्गोचर झाली असली पाहिजे. चिंतनीय अशी एक महत्वाची लीला त्यावेळीं घडली. गुरुमंदिराचा पाया खणत असतां महालक्ष्मीचा एक मुखवटा त्यावेळीं सांपडला. आदिमायेचें तें प्राकट्यच मानावें लागेल. तो या स्थानाचें स्थानदैवत आहे. गुरुमंदिर आज शक्तिपीठ म्हणून जें ओळखलें जात आहे किंवा श्रीशारदाम्बेचा उत्सव तेथें जो नित्य चालू आहे त्याचें बीजरुपानें दिग्दर्शन पाया खणत असतां दृग्गोचर झाले होतें असेंच म्हणावें लागेल.

तेच कार्य श्रीदयानन्दस्वामींनीं पुढें चालू ठेवलें. ते म्हणतात :

' स्वामी सेवा घडो मज । नाहीं मला दुजे काज ।।'

निर्याणापूर्वी गुरूंना त्यांची प्रार्थना एकच होती :

' सर्वांवर दया करा गुरुदेव, मला त्यांत आनंदच आहे.'

आणि या प्रार्थनेनें त्यांनीं आपलें नांव सार्थ केलें.

दत्तसंप्रदायांतील या मठांत तर आज भक्तांना भगवान् परशुरामांचें दर्शन घडत आहे. जागृतावस्थेंत नूपुरांचा आवाज कांहींनीं ऐकला आहे, तर बालाम्बेचें दर्शन कांहींना घडलें आहे. अवधूत दत्तात्रेयांच्या कार्यांतील परशुरामांचें स्थान परमसद्‌गुरु श्रीगजाननमहाराजांच्या कृपेनेंच भक्तमंडळींना ज्ञात झालें आहे.

अवधूतांचें स्थान म्हटलें कीं, जवळपास आपणांला शक्तिपीठ आढळणार किंवा शक्तिपीठ असेल तर जवळपास अवधूतांचें स्थान आढळणारच. कोल्हापूर,

तुळजापूर, अबूचा पहाड, ही शक्तिपीठें आहेत तर तेथें दत्तात्रेयांचें सान्निध्य आपणाला पहावयाला मिळेल. माहूरगड, गिरनार हीं दत्तात्रेयांची स्थानें आहेत, तर तीं स्थानें स्वतःच्या वास्तव्यासाठीं महाशक्तीनें निवडलेलीं ठिकाणें दिसतात. औदुंबर, गाणगापूर हीं दत्तसंप्रदायांतील स्थानें देखील भुवनेश्वरी किंवा चंदलादेवी या शक्तिपीठाजवळच आहेत. तद्वतच ज्या ज्या ठिकाणीं भगवान् परशुरामांचीं स्थानें आहेत, त्या त्या ठिकाणीं अवधूत दत्तात्रेयांचें सान्निध्य किंवा महाशक्तीचें पीठ आढळतेंच. हा त्रिवेणीसंगम सूचक आहे. महाविष्णूच्या ह्या दोन चिरंजीव अवतारांचें चिरंजीव कार्यातील ऐक्य या रूपानें व्यतीत होत आहे.

गुरुमंदिराचे सर्वाधिकार परमसद्गुरु श्रीगजानमहाराजांचेकडे येण्यांतहि असाच कांहीं संकेत आढळतो. अवधूतसंप्रदायाचा परशुरामांचें कार्याशीं असलेला घनिष्ठ संबंध यामुळें प्रकट होत आहे.

श्रीदत्तात्रेय वज्रकवचांत अभिवचन देतातः

अभक्त्या वा सुभक्त्या वा यः स्मरेन्मामनन्यधीः ।
तदानीं तमुपागत्य ददामि तदभीप्सितम् ।। २३ ।।

आणि स्वामीसमर्थांनींहि महाप्रयाणाचें वेळीं अगदीं तसेंच अभिवचन दिलें आहे.

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।।

जगत्कल्याण हेंच ज्यांचें कार्य ते याशिवाय अन्य कोणतें अभिवचन देणार !

दत्तजन्म म्हणजे निर्गुण ब्रह्मानें या पुण्यक्षणीं घेतलेलें साकाररूप होय. भूतलावर अवधूत दत्तात्रेयांचें बरोबरच श्रीविद्येचेहि अवतरण झालें म्हणूनच दत्तजयन्तीचा सोहळा हा एका अर्थानें श्रीविद्येचा भूतलावरील जन्मसोहळाच म्हणावा लागेल. वैदिकधर्मात प्राणशक्तीचा संचार हेंच त्यांचें प्रधान प्रयोजन म्हणतां येईल.

परमसद्गुरु श्रीगजाननमहाराज यांच्या कृपेनें जी दृष्टि प्राप्त झाली आणि त्यांतून श्रीविद्येचे आचार्यवर्य अवधूत दत्तात्रेय यांचें जें ओझरतें दर्शन मला घडलें तें श्रीचरणीं अर्पण करून मी आपली रजा घेतो.

• • •